मु प्रवास ८०.

# प्रकाशकाचे दोन शब्द

इतिहासाच्या अनंत साधनांपैकीं ऐतिहासिक शहरें आणि त्यांतील अवशेष यांचें महत्त्व फार आहे. आणि त्यांची माहिती स्वतंत्र पुस्तकरूपानें एकत्र केल्यास वाचकांस त्याचा उपयोग होईल या हेतूनें प्रस्तुतचें पुस्तक आम्ही प्रकाशित करीत आहों. याचप्रमाणें इतरहि ऐतिहासिक शहरांचीं आणि आजच्या जमान्यांत राजकीय, औद्योगिक प्रगतींत पुढारलेल्या शहरांचीं स्वतंत्र पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा आमचा हेतु आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या यशस्वितेवरच पुढील पुस्तकें अवलंबून आहेत हेंहि येथें सांगून ठेवणें अवश्य वाटतें.

श्री. रा. दा. जोशी हे हौशी प्रवासी आहेत. त्यांनीं ... [illegible] ...रची माहिती ' यश[illegible] ...ंच हें स्वतंत्र पुस्तक

REFBK-0005021

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं.

# विजापूर-वर्णन

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ... नं. १३६
ता. ७।५।३३
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६६३६
ठाणें

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ५०२१

साहावीं सीतउष्णादि ।
पाहावीं रम्यसीं स्थळें ॥

—श्रीसमर्थ

## प्रास्ताविक

मनुष्य हा उत्सवप्रिय प्राणी आहे. त्याच्या या उत्सवप्रियतेचें बीज नावीन्याच्या आवडींत सांपडतें. एकच एक तऱ्हेच्या आयुष्यक्रमाला शरीर व मन हीं दोन्हीहि कंटाळतात. त्या क्रमांत मधूनमधून नवीन बदल घडून आला तर मनुष्याचा शारीरिक

## यशवन्त—

संपूर्ण व भरपूर लघुकथा देणारें लोकप्रिय मासिक. दर अंकास ८ आणे, वार्षिक वर्गणी आगाऊ ५ रु., व्ही. पी.नें ५।~ रु; परदेश ७ रु.

* * *

## चार आणे माला—

प्रत्येक पुस्तकांत गुप्त पोलिसाच्या चातुर्याची एक चटकदार संपूर्ण कादंबरी असते. प्रत्येकीं किं. फक्त ४ आणे; ·।~ तिकिटें पाठवावीं.

* * *

## आठ आणे माला—

मोठ्या आकाराची सुमारें १२५ पृष्ठांची एक मनोवेधक व रहस्यमय संपूर्ण कादंबरी प्रत्येक पुस्तकांत असते. प्रत्येकीं किं. फक्त ८ आणे, ·॥= तिकिटें पाठवावीं.

**गणेश महादेव आणि कंपनी, पुणें शहर**

# विजापूर–वर्णन

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ग्रं. नं. १३६
ता. ७।५।33
ठाणे.
मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ६६३७
ठाणे.
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १०२१
ठाणे

साहावीं सीतउष्णादि ।
पाहावीं रम्यसीं स्थळें ॥

—श्रीसमर्थ

## प्रास्ताविक

मनुष्य हा उत्सवप्रिय प्राणी आहे. त्याच्या या उत्सवप्रियतेचें बीज नावीन्याच्या आवडींत सांपडतें. एकच एक तऱ्हेच्या आयुष्यक्रमाला शरीर व मन हीं दोन्हीहि कंटाळतात. त्या क्रमांत मधूनमधून नवीन बदल घडून आला तर मनुष्याचा शारीरिक

व मानसिक उत्साह सतत टिकतो; नाहीं तर त्या उत्साहास ओहोटी लागते. नावीन्याची ही आवड नैसर्गिक आहे. याच दृष्टीचा अवलंब केला म्हणजे 'वैचित्र्य हें जीवनांतील मसाला आहे'—'Variety is the spice of life' ह्या वचनाची सत्यता पटते. गोड गोड पक्वान्नांचा आस्वाद घेत असतांना मधूनमधून रुचिपालट म्हणून व्यंजन-पदार्थांचें सेवन केलें म्हणजे तो आस्वाद स्वादिष्ट होतो; नाहीं तर थोड्याच अवकाशांत त्या पक्वान्नाची शिसारी येते. जी गोष्ट मिष्ट पक्वान्नाची तीच आयुष्याच्या रहाटीचीहि. सण, उत्सव, जत्रा इत्यादिकांची योजना मानवी आयुष्य 'अधिकांत अधिक सुखदायी' व्हावें एवढ्यासाठींच आहे. आयुष्याच्या या व्यंजनपदार्थांत प्रवासाला बऱ्याच उच्च दर्जाचें स्थान मिळतें. 'सीतउष्णादि साहून' शरीराला व 'रम्यसीं स्थळें पाहून' मनाला जो उत्साह व उल्हास प्राप्त होतो तो कांहीं सांगून यावयाचा नाहीं; प्रत्यक्ष अनुभव घेऊनच पाहिला पाहिजे म्हणजे त्याची अपूर्वता कळून येते.

प्रवासानें शरीर व मन हीं उल्हसित होतात एवढेंच नव्हे, तर सुभाषितकारांनीं म्हटल्याप्रमाणें उदकांतील

तैलबिंदूप्रमाणें प्रवासानें बुद्धीचाहि विस्तार होतो. देशपर्यटन हें स्वतःच एक प्रकारचें शिक्षण आहे; म्हणूनच ज्ञानार्जनाच्या साधनांत प्रवासाचा समावेश प्रामुख्यानें होतो. निरनिराळे देश, तेथील ऐतिहासिक व सौंदर्यपूर्ण स्थळें, तेथील लोक, त्यांच्या चालीरीति इत्यादिकांचा तुलनात्मक दृष्टीनें अभ्यास केल्यानें दृष्टिकोण विस्तृत होतो; मनुष्यस्वभावाची माहिती वाढते, आणि बहुश्रुतपणाबरोबरच रसिकता अंगीं बाणून तिचा परिपोष होतो. इतिहासाचा अभ्यास परिपूर्ण-दशेस पोंचावा म्हणून प्रेक्षणीय ऐतिहासिक स्थळें पहाणें हें त्या अभ्यासाचेंच एक प्रमुख अंग आहे. राष्ट्राचा इतिहास अशा प्रकारचीं स्थळें जितक्या पूर्णत्वानें व उत्सुकतेनें शिकवितील तितक्या व्यवस्थितपणें पुस्तकें वाचूनहि तो शिकतां येणार नाहीं. 'ग्रंथवाचनानें होणारें ज्ञान पोपटपंचीरूप असतें, तर प्रवासांत मिळणारी माहिती जागृत ज्योतिरूप असते; वाचनानें होणारें ज्ञान मोजक्या भांड्यांतून ओतलेलें, दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्यासारखें आहे, तर प्रवासानें होणारें ज्ञान जित्या झऱ्याचें, स्वतःच्या ओंजळीनें पाणी पिण्यासारखें आहे.' असा शिक्षणतज्ज्ञ व प्रवासशील




नों. ६३७
मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ५ क्र. ९३६
ता. ३१/५/३२

## विजापूर—

प्रि. गो. चि. भाटे यांचा प्रवासविषयक अभिप्राय आहे. ऐतिहासिक स्थळें पाहिलीं म्हणजे तीं प्रेक्षकांना त्या त्या काळांत नेऊन सोडतात; व अशा प्रसंगीं प्रेक्षकांच्या मनांत स्फूर्तिदायक विचार आल्यावांचून रहात नाहींत. अशाच एका ऐतिहासिक स्थळाच्या प्रवासाचें इतिवृत्त पुढील लेखांत देत आहें.

आम्ही सोलापूरचे, तेव्हां लांबच्या प्रवासाला लांब अशी सवड लागते ती नसल्यानें सवड आणि शक्यता यांची सांगड घालणें भाग पडतें. सोलापूरचे जवळपास जीं कांहीं प्रेक्षणीय ऐतिहासिक स्थळें आहेत त्यांत नळदुर्ग व विजापूर हीं मुख्य होत. नळदुर्ग हा एक भुइकोट किल्ला असून तो सोलापुरापासून सुमारें तीस मैलांवर निजामसंस्थानचे हद्दींत आहे. ह्या किल्ल्याची मौज अशी कीं पावसाळ्यांत येथील नदीला जेव्हां पूर येतो तेव्हां या किल्ल्यांत एक महाल—यास पाणी-महाल असें नांव मिळालें आहे—अशा चमत्कृति-जनक कौशल्यानें बांधलेला आहे कीं त्या महालाच्या खालून व वरून पाणी वहात असतें; आणि महालांतील माणसाला खालवरच्या पाण्याचा



मालिक-ई-मैदान तोफ



लांडा कसबा तोफ

खळखळ आवाज ऐकून व प्रवाह पाहून जें श्रवण-नयनसुख प्राप्त होतें तें कांहीं अभूतपूर्व असतें. असा हा नळदुर्ग किल्ला पहाण्यास जावें कीं जेथें इतिहासांतील अनेक सामक्षा पहावयास मिळतात त्या आदिलशाहीच्या राजधानीस जावें असा आमच्यापुढें प्रश्न होता. सोलापुराहून नळदुर्गाचें अंतर कमी; अवघें तीस मैल. म्हणून सारा प्रवास एक दिवसांत होण्यासारखा होता. तथापि विजापूरचा गोलघुमट पहाण्यासाठीं सुटींतले तीनचार दिवस खर्ची पडले तरी ते सार्थकीं लागतील असा कांहीं मित्रांचा अभिप्राय होता; आणि तो सार्थ होता म्हणूनच आम्ही हें दुसरें स्थळ अधिक पसंत केलें. आगगाडीनें किंवा मोटारीनें जाण्यांत प्रवासाची खरी मौज नाहीं, अशी आमची समजूत असल्यामुळें आम्ही प्रवासाचें साधन म्हणून सायकलीचा उपयोग करण्याचें ठरविलें होतें. त्यामुळें पावसाचाहि प्रश्न विचारांत घ्यावा लागला. शेवटीं आश्विन वद्य नवमीस निघावें असें ठरलें.

महाराष्ट्रांतून विजापुरास आगगाडीनें जावयाचें म्हणजे पूर्वीं होटगी जंक्शनला उतरून एम्. एस्.

एम्. च्या गार्डीत बसावें लागे. वास्तविक यांत फारशी गैरसोय नव्हती. होटगी व सोलापूर यांचे-मध्यें एकच टिकेकरवाडी हें स्टेशन आहे. (या स्टेशनचें पूर्वीचें नांव कुमठें असें तेथल्या खेड्याचें होतें; तें बदलून त्यास सांप्रतचें नांव प्राप्त होण्याचें कारण तेथील महाराष्ट्रांत प्रसिद्ध असलेला टिकेकरांचा विणकामाचा कारखाना होय.) त्यामुळें होटगीपर्यंतचा पल्ला सोलापुरापासून लांबचा नव्हे. परंतु यामध्यें जी कांहीं थोडीशी गैरसोय होती तीहि आतां नाहींशी झाली आहे. कारण सध्यां एम्. एस्. एम्. रेल्वेचा फांटा होटगीपासून सोलापुरापर्यंत आला असून, सोलापूर हें या रेल्वे-चेंहि स्टेशन आतां झालें आहे. सोलापुरापासून विजा-पुरापर्यंतचा प्रवास आगगाडीनें सारा चार तासांचा. आगगाडीच्या वेळा व तिकिटांचे दर वेळोवेळीं बदल-णारे असल्यामुळें ते येथें देण्यामध्यें कांहीं स्वारस्य नाहीं; ती माहिती रेल्वे-गाइडवरून कुणालाहि काढतां येईल.

ठरल्याप्रमाणें आम्ही पांचजण मित्र आपआपल्या सायकली सज्ज करून आणि वाटचालीला उपयुक्त व

आवश्यक असें जुजबी सामान बरोबर घेऊन ठरल्या दिवशीं सकाळीं गुरुजनांच्या आशीर्वादासह बाहेर पडलों. सोलापूर ते विजापूर अंतर सडकेनें ६३ मैल आहे. सोलापुराहून विजापूरवेशींतून निघालों म्हणजे पहिल्या मैलाचा दगड कँप-पोस्टाजवळ लागतो. व दुसऱ्या मैलाचा दगड मोतीबागेजवळील कमर-तलावाच्या कट्ट्यावर आहे. हा तलाव कांहीं फारसा मोठा नाहीं, पण या तलावाचा बांध म्हणजे सोलापुरवासियांचें फिरावयास जाऊन विश्रान्ति घेत बसण्याचें नित्याचें ठिकाण होय. बांधाच्या खालच्या बाजूस मोतीबाग आहे; तलावाच्या एका बाजूनें एम्. एस्. एम्.चा रस्ता जातो. संध्यासमयीं या तलावाच्या बांधावर येऊन बसलें म्हणजे मोतीबागेच्या झाडींतून मावळत्या सूर्याचे किरण तलावांतील तरल तरंगांवर पडलेलें मोठें मनोहर दृश्य पहावयास सांपडतें; आणि सूर्यास्तानंतर थोड्या वेळानें वातावरणांत तमःप्रकाशाचें युद्ध सुरू होऊन प्रकाशाच्या पराभवाची पाळी येते, त्या वेळेस तलावाच्या दोन्ही बाजूंनीं अहमहमिकेनें धांवत पळत येणाऱ्या मेलगाड्या व तलावाच्या पाण्यांतील आपल्या प्रतिबिंबांसह धांव-

णाऱ्या गाड्यांच्या डब्यांतील लुकलुकणारे ते दिवे पाहिले म्हणजे घरीं परतण्याची वेळ झाली असल्याची जाणीव होते. अशा या तलावापर्यंत आपण गांवाबाहेर आलों असें वाटतच नाहीं.

सोलापूर-विजापूर रस्त्यासंबंधीं माहिती काढण्यासाठीं आम्ही मोटार-गाइडचा सल्ला घेतला होता, पण त्यांतील माहिती वाचून ती फार त्रोटक व अपुरी वाटली. सोलापुरापासून १० व्या मैलावर सीना नदी आहे. अलीकडच्या तीराजवळ हत्तूर हें मोठें खेडें असून तेथें पी. डब्ल्यू. डी. बंगला व लोकल-बोर्डाची प्राथमिक शाळा आहे. गांवाबाहेर असलेलें सिद्धेश्वराचें देवालय भोंवतालच्या झाडीमुळें रम्य वाटतें. देवालयाच्या आंतच छप्पर नसलेला एक आखाडा आहे; बाहेर वजन उचलण्याच्या व्यायामासाठीं तयार केलेल्या दगडी गोट्या पडल्या आहेत; त्यांचा उपयोग मात्र फारसा कुणी करीत नाहीं. या कानडी भाषेच्या प्रान्तांतील बहुतेक साधारण मोठ्यांपैकीं अशा खेड्यांतून अशाच तऱ्हेची देऊळ आणि आखाडा यांची अविभक्ति दिसून येते. अर्थात् भाविक भक्तानेंसुद्धां आद्य धर्मसाधन जें शरीर त्याची उपेक्षा करून चालणार

नाहीं याचीच ही ‘ रोकडी प्रचीति ’ होय, हें कोणासहि पटेल. या गांवांतून सोलापुरीं दुधाचे हंडे लोकांचें आरोग्य जाळणाऱ्या चहासाठीं रोज जात असतात. शहरापासून फार लांब नसलेल्या या खेड्यांत शहरांतल्या लबाडीनें हळूहळू प्रवेश केला आहे. या गांवांत मराठीपेक्षां कानडी बोलणारे जास्त आहेत. येथून विजापुरापर्यंत हें प्रमाण वाढतें आहे. खुद्द सोलापुरांतहि कानडी भाषा बोलणारे पुष्कळ आहेत; परंतु हें प्रमाण बरेंच कमी असल्यामुळें जन्म-भाषा कानडी नसणाऱ्याचा कानडी बोलणाऱ्या लोकांशीं संबंध येत असेल तरच त्याला कानडी येईल. आम्हां सर्वांनाच कानडी थोडें थोडें समजत आहे, तरी कानडी बोलतां येण्याइतकें ज्ञान आमच्यापैकीं कुणाचेंच नसल्यामुळें आम्हांला या प्रवासांत हें एक वैगुण्य भासलें. अर्थात् यामुळें आम्हांला जरी कुठें त्रास झाला नाहीं तरी या प्रान्तांतील खेड्यांतल्या गोरगरिबांशीं विचारविनिमय करितां आला नाहीं हा एक मोठाच तोटा झाला म्हणायचा.


सीना नदीवर दगडी फरसबंद पूल (causeway) आहे. तो फारसा उंच नसल्यामुळें पावसाळ्यांत

पुराचे वेळीं पाण्याखालीं पार बुडून जातो. सीनेला पावसाळ्यांत वरचेवर पूर येतो. पण या नदीची लांबी फारशी नसल्यामुळें पुराचें पाणी जसें भरभर चढतें तसेंच तें भरभर ओसरतेंहि. पुराचे वेळीं नाव चालू असते. सुदैवानें आम्ही गेलों तेव्हां पूर नव्हता. नदीच्या पलीकडील तीरावर वडगबाळ हें लहानसें खेडें आहे. नदी ओलांडल्यावर रस्त्याच्या दोहों बाजूंस हिरवींगार शाळूचीं शेतें दिसत होतीं. १३ व्या मैलावर उजवीकडे एक सडक फुटते, ती मंद्रूप गांवास जाते. आम्ही येथें आलों तेव्हां इथल्या पाटीवरचीं अक्षरें पंचमहाभूतांच्या प्रभावानें पार पुसून गेलीं होतीं, त्यामुळें थोडे घोटाळलों. थोड्या दिवसांखालीं मंद्रूप येथें एक शेतकी-प्रदर्शन भरलें होतें. त्याचा उद्‌घाटनसमारंभ मध्यविभागाच्या कमिशनरांच्या हस्तें झाला; त्यांच्या आगमनाप्रीत्यर्थ रस्त्याची दुरुस्ती झाली त्याबरोबर या पाटीचाहि जीर्णोद्धार झाला आहे. तेव्हां आतां या रस्त्यानें जाणाऱ्या प्रवाशाची आमच्याप्रमाणें दिशाभूल होणार नाहीं. असो. १६ व्या मैलावर नांदणी हें खेडें एका लहानशा टेंकडीवर वसलेलें आहे. जवळच एक


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. ५०२२

छोटासा तलाव आहे, त्यानें गांवाची पाण्याची सोय झाली आहे. नांदणी ओलांडल्यावर थोडासा उतार लागला. २० व्या मैलावर भीमा नदी आहे. सीना व भीमा या दोन नद्यांच्या मधला हा दहा मैलांचा प्रदेश शेतकीच्या दृष्टीनें अत्यंत समृद्ध आहे. मुख्य पीक ज्वारीचें. पुण्याच्या शेतकी-प्रदर्शनांत याच प्रदेशांतील ज्वारी पहिल्या प्रतीची ठरली होती. भीमेच्या कांठीं अलीकडच्या तीरावर टाकळी हें गांव आहे, येथें नदीवर पूल नाहीं. पावसाळ्यांत पाणी जास्त असतें तेव्हां नाव चालू असते; एरवीं पायउतारानें नदीपार जातां येतें. मोटारीनें विजापुरीं जाणाऱ्या उतारूंना अलीकडच्या तीरावर उतरून पायउतारानें व जरूर तेव्हां नावेनें पलीकडे जाऊन, पुढें त्याच सर्व्हिसच्या दुसऱ्या मोटारीनें विजापुरीं जावें लागतें. तिकिट थेटचें असतें. नाव चालण्याइतकें पाणी नसेल व पायउतारानें जाण्याला पाणी जास्त असेल तेव्हां बैलगाड्यांचा उपयोग करावा लागतो. आम्हीं नदीवर आलों तेव्हां नदीला पूर आलेला होता; अर्थात् आम्हांला नावेंतून पलीकडे जावें लागलें. येथें नावेचें काम कसें चालतें त्याचें थोडेंसें

वर्णन दिल्यास तें अप्रस्तुत होणार नाहीं असें वाटतें. नदीच्या दोन्ही तीरांवर दोन उंच दगडी चौथरे बांधलेले असतात. चौथऱ्याच्या मधोमध एक भक्कम लांकडी खांब रोंवलेला असतो, व त्याला मजबुती यावी म्हणून चार बाजूंनीं चार खांबांचे आधार दिलेले असतात. दोन्ही तीरांवरच्या मधल्या खांबांना जोडणारा एक लांबच लांब लोखंडी तारांचा दोर पांचसहा इंच घेराचा नेलेला असतो, व तो दोन्ही तीरांवर जमिनींत रोंवलेल्या मेखांना पक्का बांधून ठेवलेला असतो. ह्या मजबूत लोखंडी तारांच्या दोराला एक सरकती कप्पी Sliding Pulley अडकवलेली असते. या कप्पीला दोन मजबूत दोर बांधलेले असून त्यांचीं दुसरीं टोकें नावेला बांधलेलीं असतात. नाव तीरावर चिखलांत रोंवलेल्या एका मेखेला दोरानें बांधलेली असते. नावेंत उतारू बसले म्हणजे हा दोर सोडून नावेवर घेतात व नावेचा तीराशीं असलेला संबंध तुटतो. प्रवाहाच्या जोरामुळें नाव प्रवाहाच्या दिशेनें वाहूं लागते; पण ती कप्पीला दोरांनीं जोडली असल्यामुळें हे दोर ताठ झाले म्हणजे कप्पी लोखंडी दोरावर सरकते, व नाव वहात न जातां लोखंडी दोराशीं समान्तर अशा रेषेंत पलीकडल्या



मेहेतर महाल




गगन महाल

तीराकडे जाते. नाव परतीराजवळ आली म्हणजे नावाडी कप्पीचा एक दोर सैल सोडून दुसरा दोर ओढतो व कौशल्यानें नाव तीराला लावतो. दुसरा नावाडी काठीच्या साहाय्यानें तीरावर उडी घेऊन चिखलांत मेख रोवतो व तिला नाव दोरानें बांधून ठेवतो. हें काम झटपट झालें नाहीं तर नाव परत अलीकडल्या तीराकडे कप्पीच्या सरकण्यामुळें येऊं लागते. या नावेला वल्हविण्याचे श्रम नाहींत. नावहि पुष्कळ मोठी असते; म्हणून तिच्यांतून उतारूंप्रमाणेंच जनावरें, बैलगाड्या व मोटारगाड्याहि या तीराच्या त्या तीरास नेतां येतात. वाहतुकीचे दर ठरलेले असतात. नाव पी. डब्ल्यू.डी.ची असते. नावाडी कंत्राटानें ती आपल्या ताब्यांत घेतो व त्याबद्दल त्याला लिलांवांत जास्तींत जास्त पैसे द्यावे लागतात. नावाड्याला वाहतुकीच्या दरांत फेरबदल करतां येत नाहीं. त्याचें उत्पन्न अर्थात् वर्षांतून नाव जितके जास्त दिवस चालेल व वाहतुक जितकी जास्त होईल त्यावर अवलंबून असतें.

भीमा नदी ही सोलापूर व विजापूर या जिल्ह्यांमधली नैसर्गिक हद्द आहे. आम्ही नावेंत चढतांना

## विजापूर—

सोलापूरचे हद्दींत होतों व उतरलों ते विजापूरचे हद्दींत उतरलों. नदीच्या या तीरावर एक धर्मशाळा आहे; गांव मात्र नाहीं. आम्ही येथें न थांबतां पुढील मार्ग आक्रमण्यास सुरुवात केली. नदीपासून दोनतीन मैल गेल्यावर साधारण रुक्ष प्रदेश लागला; त्यांतून माध्यान्हींचें ऊनहि चटके देत होतें. २६ व्या मैला-वर एक निर्मळ ओढा लागला, तेथेंच एका छाया-तरूखालीं दुपारचा तळ दिला. जवळच एक खेडें दिसत होतें तिकडे आम्ही गेलों नाहीं. एक तर भाषेची अडचण, व दुसरें म्हणजे आम्हांला तशी जरूरहि नव्हती. ओढ्याकांठीं आम्हीं आमची शिदोरी सोडली; व भूकहि सपाटून लागली असल्या-मुळें आम्हांला हें वन-भोजन फार रुचकर लागलें. साधारणपणें तीन वाजेपर्यंत विश्रान्ति घेऊन सामा-नाची आवराआवर केली व पुढील मार्गक्रमणास लागलों. अद्यापि ३७ मैल जायचें होतें. बाजूच्या शेतांतून कपाशीच्या लागवडीचें प्रमाण सोलापूर जिल्ह्यापेक्षां अधिक दिसलें; शाळूची लागवडहि कमी दिसली. चांगली दहापंधरा मैलांची मजल सपाट्यानें मारली. वाटेंत ३१ व्या मैलावर झाळकी गांव

लागलें. येथें पी. डब्ल्यू. डी. चा बंगला आहे. येथून एक सडक चडचणकडे जाते. या प्रदेशांत मधून मधून ओढे बरेच लागत होते; पावसाळ्याच्या अखेरीचेच दिवस असल्यामुळें पाण्याचा सुकाळ होता. आजूबाजूला थोड्याशा टेंकड्याहि दिसूं लागल्या. मध्येंच एक पश्चिमवाही ओढा लागला. बाकीचे ओढे ( व नद्याहि ) पूर्ववाही असल्यामुळें हा ओढा उलटा वाहणारा वाटला. यावरून मागील प्रवासांतील तापी-नर्मदा या नद्यांची आठवण झाली; त्याहि पश्चिमवाहिनी असल्यामुळें उलटया वहातात असें वाटतें. असो. ४३ व्या मैलावर आलों तेव्हां मैल—दीड मैलाचा टेंकडीचा चढ लागला; तो चढून गेल्यावर १८ मैल अंतरावरचा **गोलघुमट** दिसूं लागला. एखादें मोठें डेरेदार वडाचें झाड दुरून दिसावें तसा हा दूर क्षितिजाजवळ दिसत होता. येथून पुढें बराच उतार होता; तो संपल्यावर एक खेडें लागलें. त्याच्या अलीकडे एक ओढा वहात होता; त्या ओढयाच्या पुलावरून चाललों तों उजवीकडे ओढयाचें पाणी एका लहानशा कडयावरून उडी घेत असून त्या ठिकाणीं एक धबधबा बनला आहे असें दृष्टीस

पडलें. दिवसाचा प्रवास संपवून सूर्य अस्तास चालला होता. अशा वेळीं मंजुळ मर्मरनिनाद करणाऱ्या धबधब्याजवळ पंधरावीस मिनिटें बसून विश्रान्ति घेतली. ओढयाचें निर्मळ पाणी प्यालों तें अमृतासारखें गोड लागलें; आणि पुढें जाण्याची ओढ नसती तर त्या धबधब्याजवळ किती तरी वेळ बसलों असतों. तिथून उठलों तेव्हां तो ओढा एका आंग्ल कवीनें म्हटल्याप्रमाणें 'Men may come, and men may go; but I shall go on for ever.'

किती येवो जावोत मनुज येथें ।
नित्य वाहें मी आपुल्याच पंथें ॥

असेंच जणुं म्हणत आहे असा भास झाला. असो.

आतां पाणी पिऊन विश्रान्ति घेऊन आम्ही ताजेतवाने झालों होतों; म्हणून जोरानें मार्ग क्रमण्यास सुरवात केली. वाटेंत लागणाऱ्या कांहीं ओढयांचें पाणी दगडी फरशांवरून वहात जात होतें. अशा ठिकाणीं आम्ही सायकली ब्रेक न लावतां उतारावर जोरानें जाऊं देत होतों. पाण्याच्या पलीकडे जाण्याइतपत वेग साधारणपणें मिळतोच, मात्र पाय वर घ्यावे लागतात. सूर्यास्त होऊन अंधार पडूं लागला

होता, शेतांत झोपडयाझोपडयांनीं रहाणारे लमाण-लोक आपलीं गुरेंढोरें झोपडीकडे हांकून नेत होते. अशा वेळीं एका ओढयाचें पाणी किती आहे याचा अदमास न लागल्यामुळें अपघात होऊन आमच्यापैकीं एकाच्या गुडघ्याला थोडीशी जखम झाली. विजापूर आतां सारें सहा मैल राहिलें होतें. वाटेंत एक नाका लागला. तेथें शहर किती दूर आहे याची चौकशी केली. शहरांतील दिवे दिसूं लागलेच होते. नाक्या-पासून दोनतीन मैलांवरच शहर आहे असें कळल्यावर आम्ही पूर्वेक्त मार्ग क्रमूं लागलों. त्यांतून वद्यपक्षाचा अंधार, वाट लवकर ओसरेना. शहरांत कधीं पोंचूं याची उत्कंठा लागल्यामुळें हे मैल लवकर जाईनात; व ‘ शेवटचा मैल सर्वांत जास्त लांबीचा असतो ’ या अर्थाच्या आंग्ल म्हणीच्या सत्यतेची प्रचीति येऊं लागली. अखेरीस आठ वाजण्याचे सुमारास एकदांचे या आदिलशाहीच्या राजधानींत आलों. उतरण्यासाठीं जागेचा शोध घेत घेत शहरांतील श्रीमहालक्ष्मीच्या देवळाजवळील धर्मशाळेंत आलों. हें देऊळ व ही धर्म-शाळा श्रीमंत देसाई वकिलांची आहे. तेथें रहाण्यास त्यांची परवानगी लागते. ती आम्हीं दुसरे दिवशीं

मिळविली. तेथें आम्हांला एक खोली मिळाली. सर्व सोय लागल्यावर पथाऱ्या पसरून निद्रेची झांपड आमच्यावर कशी पडली हें कांहीं कळून आलें नाहीं.

दुसरे दिवशीं आम्ही पहांटेसच जागे झालों, व प्रातर्विधी उरकून नळाला पाणी येण्याची वाट पहात बसलों. विजापुराला पाण्याची थोडीशी गैरसोयच आहे. शहराबाहेर तीनचार मैलांवर तोरवी नांवाचा एक तलाव आहे त्याचें पाणी विजापुरास येतें. सकाळीं सहा ते दहा चार तास व सायंकाळीं चार ते सहा दोन तास नळाला पाणी असतें. नळाला पाणी आल्यावर आंघोळी केल्या व नंतर शहरांतील प्रेक्षणीय स्थळें पहाण्यासाठीं बरोबरचें सामान खोलींत ठेवून व खोलीला कुलूप ठोकून बाहेर पडलों.

स्थळ प्रत

## गोल-घुमट

गोलघुमट आधीं निवान्तपणें पाहून मग इतर स्थळें पहावयाचीं असें आम्हीं ठरविलें होतें, म्हणून आधीं तिकडेच मोर्चा वळविला. विजापूरचें स्टेशन पूर्वेस गांवाबाहेर गोलघुमटाच्या पलीकडे आहे. गांवांतून स्टेशनवर जाण्यास जो रस्ता जातो त्याच रस्त्यावर महालक्ष्मीचें देऊळ आहे. देवळापासून स्टेशनकडे या रस्त्यानें चाललें म्हणजे प्रथम उजव्या अंगाला शहर-म्युनिसिपालिटीची कचेरी दिसते. थोडें पुढें गेलें म्हणजे एक मोठा चौक लागतो; तेथें मध्य-भागीं एडवर्ड बादशहांचा पुतळा आहे. चौकांतून उत्तरेकडे दोन रस्ते शहराच्या बाजारपेठांकडे जातात; व पूर्वेस जाणारा रस्ता स्टेशनकडे जातो. या रस्त्यानें चौक ओलांडल्यावर थोड्याशा अंतरावर डाव्या बाजूला डाक-घर व दुष्काळघर Famine-House लागतात. येथून मैल–दीड मैल पुढें गेल्यावर डाव्या बाजूला गोलघुमटाची प्रचंड इमारत दिसते. स्टेशन-रस्त्यावरून गोलघुमटाच्या विस्तृत आवारांत शिरल्यावर प्रथमतः अजबखान्याची इमारत

लागते; तिच्या पलीकडे गोलघुमट आहे. प्रवेशद्वारीं पुराणवस्तुसंशोधनखात्याचे कारकून व शिपाई वसण्याची जागा आहे. येथें गोलघुमट पहाण्याकरितां तिकिटें ( प्रत्येकीं दोन आणे ) घ्यावीं लागतात. तिकिटें तीनचार महिन्यांपासूनच ठेवलीं आहेत असें कळलें; यापूर्वी गोल-घुमट मोफत पहातां येत असे. आम्ही गेलों तो आठांचा सुमार होता; कारकून अद्याप आले नव्हते; तेव्हां तेथील शिपायानें आम्हांस तिकिटें दिलीं व आम्हांस त्या तिकिटांची नोंद त्यांच्या खात्याच्या तेथील वहींत करावयास सांगितली. त्याप्रमाणें नोंद करून—यांत प्रेक्षकाच्या मूळ गांवच्या पत्त्याची नोंदहि करावी लागते—आम्ही तीं तिकिटें घेतलीं, व शिपायानें दाखविलेल्या डाव्या हाताच्या कोपऱ्यांतील जिन्यानें गोलघुमटाचा मिनार चढण्यास सुरवात केली.

गोलघुमट ही प्रचंड इमारत दक्षिणाभिमुख आहे. तिचा आकार चौकोनी असून चौकोनाची प्रत्येक बाजू १३५ फूट लांब आहे. चारी कोपऱ्यांवर चार सात-मजली मिनार आहेत. या चारहि मिनारांतून दगडी वाटोळे जिने असून प्रत्येक मजल्यावर गॅलरी आहे. सध्यां एकाच मिनाराचा मार्ग उघडा असून

बाकींचे बंद केले आहेत. मिनार चढून गेल्यावर वर गच्ची आहे. या गच्चीच्या मध्य-भागींच तो जगद्विख्यात घुमट उभारलेला आहे. गच्चीवरून भोंवतालचा देखावा फार मनोहर दिसतो. एका बाजूस पूर्वेकडे तें रेल्वे-स्टेशन व ती दक्षिणोत्तर जाणारी रेल्वेलाइन दूरपर्यंत दिसते. विजापूर शहाराचा तट कुठें शाबूत, कुठें ढांसळलेला असा दिसतो. दुसऱ्या बाजूस पश्चिमेकडे शहराला वेढा घालणारा तो तट, जागोजाग असलेले ते बुरूज, शहराचा तो विस्तार, त्यांतून वर मान करून डोकावणाऱ्या त्या उंच इमारती, तीं देवळांचीं शिखरें इत्यादिकांच्या देखाव्याचें विहंगम दृष्टीनें निरीक्षण करीत असतांना इतिहासांतील स्थित्यंतरें चित्रपटाप्रमाणें मनश्चक्षूंपुढून जातात, व निरीक्षकाचे हृदयांत नानाविध भावनांचा उद्रेक होऊन त्यांचें पर्यवसान सर्वभक्षक काळाच्या प्रभावाची कठोर पण सत्यपूर्ण जाणीव होण्यांत होतें. दूरवर ती क्षितिजांत विलीन होणारी वायव्येकडे जाणारी सोलापूर-सडक तिच्या बाजूच्या झाडांच्या रांगेनें भोंवतालच्या भूप्रदेशांत उठून दिसते. त्याच दिशेकडे तोरवी तलावाचें पाणी सूर्यप्रकाशांत चमकत असलेलें दृष्टीस

पडतें. असा हा विस्तृत भूप्रदेश पहात असतांनाच मधून मधून दिसणारे ते मुसलमानी इमारतींचे अवशेष, अंतःकरणांत गतेतिहासाची स्मृति जागृत करून कालाचें माहात्म्य सूचित करण्याकरितां येथें जीव धरून पंचमहाभूतांशीं कशीबशी टक्कर देत उभे आहेत कीं काय असा भास होतो. असो. गच्चीवरून दिसणाऱ्या त्या देखाव्यावरून दृष्टि काढून घुमटांत जाण्याचा रस्ता शोधावा लागतो; कारण घुमटांत प्रवेश करण्यासाठीं पुष्कळ मार्ग आहेत, तरी त्यांतले बरेचसे बंद केलेले आहेत. घुमटांत प्रवेश करून आंतल्या गॅलरींत समोरासमोर ठेवलेल्या बांकावर बसलें व कोणत्याहि तऱ्हेचा लहानमोठा आवाज केला म्हणजे त्याचा सात वेळां सुस्पष्ट प्रतिध्वनि ऐकूं येतो. तो ऐकला म्हणजे जगांतील आश्चर्यांत या घुमटाला मिळालेलें स्थान अगदीं यथार्थ आहे हें प्रत्ययास येतें. हिंदुस्थानांतील दुसरें आश्चर्यस्थळ म्हणजे आग्र्याचा ताजमहाल. त्याचें सौंदर्य दृष्टिरमणीय आहे तर या घुमटाचें सौंदर्य श्रुतिरमणीय आहे. म्हणजे हा घुमट दर्शनीय नाहीं असें मात्र नव्हे; त्याचा तो अर्धगोलाकार उठाव दर्शनीय तर खराच,

पण त्याच्या आश्चर्यतेचें रहस्य कोणत्याहि आवाजाच्या सुस्पष्ट ऐकूं येणाऱ्या सात प्रतिध्वनींतच असल्यामुळें त्याचें सौंदर्य श्रुतिमनोहर आहे. गोलघुमटास बोळ-घुमज असेंहि म्हणतात.*

गोलघुमटाचा चौथरा चोवीस फूट उंच असून गॅल-रीची उंची १०५ फूट आहे. गॅलरीचा व्यास सुमारें सवाशें फूट असून गॅलरीवर घुमटाची उंची ९० फूट आहे.§ आम्हीं या घुमटाचे गॅलरींत किती तरी

---

* बोळघुमज नांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं, ह्यास कळस पूर्वापार नाहीं. सुलतान महंमद यानें एक कळस केला होता, पण तो लहान दिसूं लागल्यामुळें काढून टाकिला; म्हणून, किंवा कित्येक ठिकाणचें याचें नाजुक काम करण्याचें तसेंच राहिलें म्हणून यास बोळघुमज ( बोडका घुमज ) असें म्हणूं लागले. हल्लीं विजापुरांत ह्यास गोलघुमज म्हणतात. मूळ शब्द 'गुंबद' असा आहे. गुमज, घुमज, घुमट वगैरे शब्द अपभ्रंश होऊन झाले आहेत.

§ जमिनीपासून घुमटाची उंची सुमारें २२५ फूट भरते. ताजमहालाची तळमजल्यापासून कळसापर्यंत

प्रकारचे आवाज केले; हंसलों, ओरडलों, टाळ्या पिटल्या, दंड ठोकले, आणि गाणीं म्हटलीं; अशा विविध तऱ्हेचे आवाज काढून त्यांचे प्रत्येकीं सात प्रतिध्वनि ऐकण्यांत अभूतपूर्व असें श्रवणसुख अनुभवलें. अशा तऱ्हेचे प्रतिध्वनि ऐकूं येतात हें पुष्कळदां ऐकलें व वाचलें असूनंहि त्यांची अपूर्वता कोणत्याहि तऱ्हेनें कमी तर झाली नाहींच, व म्हणूनच ती आश्चर्यसुखोत्पादक झाल्यावांचून राहिली नाहीं. दुसरीहि एक गोष्ट अशीच अपूर्व वाटली. गॅलरींत अगदीं समोरासमोर असलेलीं ( Diametrically opposite ) कोणतींहि दोन स्थळें घेतलीं तर त्यांपैकीं एका स्थळीं केलेला अत्यंत सूक्ष्म आवाज नेमका समोरच्याच स्थळीं जितका स्पष्ट ऐकूं येतो तितका इतर स्थळीं येत नाहीं. याच कारणासाठीं गॅलरींतील बांक अगदीं समोरासमोर असे आहेत. या बांकावर वसल्यास घड्याळाची टिक्टिक् किंवा

---

उंची २५० फूट आहे. तेव्हां या दोन्ही जगप्रसिद्ध इमारतींच्या उंच्या जवळ जवळ सारख्याच आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

टांचणीचा आवाजसुद्धां इकडला तिकडे ऐकूं येतो. घुमटाचा अत्युच्च मध्यबिंदु तळापासून १९८ फूट उंच आहे. गॅलरींत उभें राहून खालीं तळाशीं असलेल्या थडग्याकडे,—कारण गोलघुमट ही इमारत वस्तुतः महंमद आदिलशहाच्या थडग्याप्रीत्यर्थ बांधलेली आहे—तिथल्या त्या कारकुनाकडे व शिपायांकडे पाहिलें म्हणजे गॅलरीच्या उंचीची (११० फूट) कल्पना येत. घुमटाची आंतून किंवा बाहेरून दुरुस्ती करण्याचें काम बरेंच धोक्याचें आहे. अलीकडे घुमटाची थोडीशी पडझड होऊं लागली आहे. दुरुस्तीसाठीं सरकारची व्यवस्थाहि आहे; आणि त्या कामीं आधुनिक शिल्पशास्त्रज्ञांच्या ज्ञानाचा चांगलाच कस लागत आहे. घुमटाचें श्राव्यसौंदर्य आजहि अबाधित आहे हें खरें; परंतु वारंवार होणाऱ्या दुरुस्त्यांतून घुमटाच्या मुळांतील बांधणीचा सांधा बेमालूम जोडला जात नसल्यानें सर्वच परस्पर-समोरासमोरच्या बिंदूंचे ठिकाणीं ध्वनि-प्रतिध्वनि स्पष्ट येत नाहींत, असें विजापूरचे जुने रहिवासी सांगतात.

घुमटाच्या त्या गॅलरींतील ध्वनि-प्रतिध्वनि ऐकून ऐकून व बाहेरील गच्चीवरून दिसणाऱ्या भूप्रदेशाचें

निरीक्षण करून करून आमच्या श्रवणनयनाची तृप्ति झाल्यावर आम्ही मिनारांतील जिना उतरून खालीं आलों, आणि गोलघुमटाच्या एका अंगाला असलेली पुष्करणी व तिच्या पलीकडची प्रार्थना-मशीद पाहिली; तसेंच गोलघुमटाच्या तळघरांतील थडगींहि पाहून आलों. मुसलमानांच्या नेहमींच्या रिवाजाप्रमाणें अस्सल थडगीं असतात तीं हीं तळघरांतलींच होत; वरच्या इमारतींत दिसून येणारीं तीं केवळ नक्कल होत. तळघरांत महंमदशहाच्या थडग्याशिवाय आणखी पुष्कळ थडगीं आहेत, तीं बहुतेक राजघराण्याशीं संबंध असलेल्या स्त्री-पुरुषांचीं असावींत. यानंतर आम्हीं अजबखाना पाहिला. येथें खुद्द विजापुरांत व त्याच्या आसपासचे प्रदेशांत, विशेषतः बदामी-बागलकोटकडे सांपडलेल्या नानाविध पुराण-वस्तु संग्रहीत करून ठेवल्या आहेत. मुंबईचा प्रिन्स ऑफ् वेल्स् अजबखाना पाहिलेल्यांनाहि येथील पुराण-वस्तु अजब वाटल्यावांचून रहाणार नाहींत. बुद्ध-जैनकालीन मूर्ति, शिलालेख, शस्त्रादि युद्ध-सामुग्री, नानाविध वस्त्रें, नाणीं, हस्तलिखितें इत्यादींचा संग्रह इतर सर्व अजबखान्यांप्रमाणें येथेंहि पहावयास सांपडतो. पण

याहून महत्त्वाचा असा येथील संग्रह म्हणजे पुराण-चित्रांचा व मातीच्या नानाविध भांड्यांचा. येथील चित्रसंग्रहांत आदिलशाहीच्या राजघराण्यांतील स्त्री-पुरुषांचीं, सरदारांचीं व इतिहासांतील प्रसंगांचीं अनेक चित्रें तर आहेतच; शिवाय मोगल बादशहा, शीख गुरु व पेशवे यांचींहि चित्रें येथें पहावयास मिळतात. त्यांतील एक चित्र पेशवे स्वारीवर निघाले आहेत या प्रसंगाचें फारच बहारीचें आहे असें आम्हां सर्वांनाच वाटलें. याशिवाय केवळ कलेखातर काढलेलीं चित्रेंहि निरनिराळ्या रागरागिण्यांचीं वगैरे पुष्कळ आहेत. येथील मातीचीं नानाविध भांडीं, मोठमोठे रांजण व त्यांची तकाकी ( Glazing ) पाहून या प्रान्ताची प्राचीन कुंभारीची कला किती उन्नतावस्थेला पोंचली होती याचें आश्चर्य वाटतें. घुमट व अजबखाना पाहून मात्र असें वाटलें, कीं सरकारनें घुमट पहाण्यासाठीं तिकिटें ठेवण्याऐवजीं या अजबखान्याला तिकिटें ठेवलीं असतीं तर त्यांत गरीबांची सोय झाली असती. सरकारला उत्पन्नच काढावयाचें झालें तर घुमट पहाण्यासाठीं मोफत पास ठेवून प्रेक्षकांच्या पत्त्यांची नोंद करावी व घुमटाच्या इमारतींत



मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नं.

विजापूर—

भिंतींवर जिकडेतिकडे स्वतःचीं नांवेंगांवें लिहिण्या-कोरण्यांत भूषण व प्रौढी मानणाऱ्या प्रेक्षकांवर—अशा तऱ्हेचे प्रेक्षक सगळीकडेच दिसतात—इमारतीला विद्रूपता आणण्याच्या गुन्ह्याबद्दल खटले भरून जबर दंड वसूल करावेत; म्हणजे उत्पन्नाची वाढ होऊन असल्या प्रेक्षकांच्या हीन मनोवृत्तींवर जरब बसून तिला कांहीं तरी आळा पडेल. असो.

## जुम्मा-मशीद

गोलघुमटानंतर आम्ही **जुम्मा-मशीद** पहावयास गेलों. वाटेंत विजापुरांतील नवीन वस्ती लागते. जुम्मा म्हणजे इस्लाम-धर्मीयांची दर शुक्रवारीं होणारी सामुदायिक प्रार्थना. या भव्य मशिदींत जवळजवळ चार हजार मुसलमानांची प्रार्थनेला बसण्याची सोय आहे. ही दक्षिणेंतील सर्वांत मोठी मशीद होय. पहिल्या अलि-आदिलशहानें गादीवर येण्यापूर्वींच इ.स. १५३७ त ही बांधावयास सुरवात केली; आणि त्यानें व त्याच्यानंतरच्या सर्व आदिलशहांनीं जरी मशिदीच्या बांधकामाकडे पुष्कळ लक्ष पुरविलें, तरी ती पूर्ण बांधून झाली नाहीं. घुमटाच्या चार बाजूंस व्हावयाचे मिनार तसेच राहून गेले. १६८६ त औरंगजेबानें विजापूर काबीज़ केलें, तेव्हां त्यानें मशिदीचें प्रवेशद्वार बांधलें असें म्हणतात. सातारच्या छत्रपतींनींसुद्धां मशिदीच्या बांधकामांत भर टाकली असें सांगतात. मशिदीचें मुख्य प्रवेशद्वार पूर्वेकडचें आहे; पण वहिवाट उत्तरेकडच्या दरवाजानेंच होते. मशिदीचा घुमट १२० फूट उंच असून त्याचा व्यास

५७ फूट आहे. गोलघुमटाच्या व्यासापेक्षां ( १२४ फूट ) हा निम्म्याहूनहि कमी असला तरी हा घुमट त्यापेक्षां अधिक डौलदार दिसतो. तेथील मुसलमान-रक्षकानें मशिदीविषयीं माहिती सांगतां सांगतां—ही पोपटासारखी पाठ झालेली असते—तेथील भिंतीवर पवित्र कुराणांतील खोदलेले. लेख व त्यावर आदिल-शाहींच्या काळीं झालेली सोनेरी मुलाम्याची रंगावट दाखविली व 'यथाशक्ति मान करा' असें सांगितलें. त्यास आमचेकडून नकार मिळाल्यावर हा वेळपर्यंत पैसारूपी फळाच्या आशेनें गोड गोड बोलणाऱ्या त्या पोपटानें त्या फळाची आशा सफल होत नाहीं हें पाहून आम्हांस शिव्या देऊन चंचुप्रहार करण्यास सुरवात केली. तेव्हां 'तूं पुराणवस्तु संशोधन खात्यांतील सरकारी नोकर आहेस, तुला अशा रीतीनें प्रेक्षकांना लुबाडण्याचा हक्क नाहीं.' असें त्याला बजावून निवान्तपणें मशीद पाहून झाल्यावर बाहेर पडलों. अजबखान्याच्या रक्षकानें आम्हांला खुषी (?) मागितली होती, पण आम्हीं त्याला आपल्या पगारांतच खुषी मानून रहावें असें सांगितलें. प्रेक्षणीय व प्राचीन स्थळांच्या रक्षकांची ही खुषीची मागणी सर्वच ठिकाणीं आढ-

ळून येते. त्याला सरकारनें तर आळा घातला पाहिजेच, पण प्रेक्षकांनींहि त्यास हातभार लावतां कामा नये. शिव्या खाण्याचा व प्रसंगीं त्यांना खाऊं घालण्याचा प्रसंग आला तरी बेहेत्तर, पण कोणाहि प्रवाशानें स्वतःच्या पदरचा पैसा खर्च करून असली साळसूद गुन्हेगारी वाढविण्याच्या पापाचे अधिकारी मात्र होऊं नये, अशी येथें प्रवासपर वाचकांना सूचना करावीशी वाटते. जुम्मामशीद पाहून झाल्यावर भुकेची वेळ झाल्यामुळें (आणि शिव्या खाऊन भूक कांहीं शान्त झाली नव्हती.) आम्ही धर्मशाळेकडे परतलों.

जातां जातां वाटेंत **मेहतर-महाल** लागला. हा महाल एक लहानसा टुमदार असा शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. याच्या नांवाबद्दल पुढील आख्यायिका प्रचलित आहे. पूर्वी पहिल्या इब्राइम आदिलशहाला एक रोग झाला होता. बादशहानें पुष्कळ उपाय केले; ते सर्व फोल ठरल्यावर एका नामांकित ज्योतिषानें असें भविष्य सांगितलें कीं, " उद्ईक सकाळीं पहिल्यानें ज्याचें तोंड बादशहाच्या नजरेस पडेल त्याला जर बादशहानें

पुष्कळ संपत्ति देऊन खूष केलें तर बादशहाला फार आराम वाटण्याचा योग आहे.'' बादशहाचा त्या ज्योतिष्यावर विश्वास होता, म्हणून त्याला रात्रभर नीट झोंप आली नाहीं. सकाळीं बादशहाची स्वारी शहरांतून फेरफटका करण्यासाठीं बाहेर पडली, तों बादशहाला पहिल्यानें दृष्टीस पडलेला माणूस एक मेहतर ( भंगी ) होता. ज्योतिषाचा कावा असा होता, कीं आपण स्वतःच पहांटेस उठून बादशहाच्या शयन-मंदिराच्या प्रवेशद्वारीं जाऊन बसावें, म्हणजे आपणच प्रथम त्याच्या दृष्टीस पडूं. पण त्याचा डाव फसला. इकडे बादशहानें त्या मेहतराला शिपायांकडून बोलावणें पाठविलें. आपल्या हातून कांहीं अपराध झाला कीं काय, व बादशहा आतां कसली शिक्षा करतो कोण जाणे, या शंकेनें तो भीतभीतच बादशहाच्या पुढें आला. त्याला बादशहानें खूप संपत्ति दिली. मेहतराला प्रथम ती सारी थट्टाच वाटली. पण जेव्हां त्याला खरा प्रकार कळला तेव्हां तर त्याला हर्षवायु होण्याची पाळी आली. असो. बादशहानें दिलेल्या संपत्तींतून आपणावर त्यानें केलेल्या मेहरनजरेचें आणि औदार्याचें स्मारक म्हणून त्या मेहतरानें

जी इमारत उभारली तिलाच मेहतर-महाल असें नांव आहे.

परंतु ही आख्यायिका खरी दिसत नाहीं. पहिल्या इब्राइमशहाच्या वेळच्या (१५३४–१५५७) इमारतींत या महालांत दिसून येणारें दगडी कोरीव-कामाचें कौशल्य दिसून येत नाहीं. दुसरी एक आख्यायिका अशी सांगतात, कीं दुसऱ्या इब्राइमशहाच्या कारकीर्दींत विजापूर अत्यंत वैभवसंपन्न असल्यामुळें गांवांत भिक्षेकरी विलकूल आढळत नसत. इब्राइमशहाच्या मनावर हिंदु आचारविचारांचा पगडा बराच बसलेला होता. तो भिक्षेकऱ्यांना दानधर्म करण्यासाठीं आपल्या खासगी खर्चांतला पैसा बाजूला काढून ठेवीत असे. जेव्हां या पैशाचा विनियोग करण्यासाठीं भिक्षेकरीच मिळेनात, तेव्हां आपल्या राज्यावर दानधर्माच्या अभावीं कांहीं संकट येऊं नये म्हणून बादशहानें ही संपत्ति फकीर-समाजाला दिली. फकीर-समाजाचा मुख्य मेहतरगड या नांवाचा होता. त्यानें या संपत्तीचा विनियोग धर्मप्रीत्यर्थ व्हावा म्हणून हा महाल व त्यासोबतची मशीद बांधली. हा महालहि या मशिदीचें प्रवेशद्वार आहे. ही

आख्यायिका संभवनीय दिसते, पण तिला इतिहासाचा आधार सांपडत नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. महालासोबतची मशीद अगदींच लहान आहे.

एकंदरींत ही महालाची इमारत जरी ४० फूट उंचीची व हमचौरस २५ फूट लांबीरुंदीची अशी छोटेखानीच आहे तरी तिच्या कारागिरीची कुशलता पाहून मिसर देशांतील पिरामिडसारख्या इमारती पाहिलेले साहेब-लोकहि नवल करितात !

आम्ही हा टुमदार महाल चढून वरच्या गच्ची-वरून शहराचा देखावा पहात होतों, तोंच कुणी वात्रट मुलानें महालाच्या प्रवेशद्वाराला बाहेरून कडी लावली. आम्ही खालीं आलों तेव्हां आम्हांला हें समजलें. आम्हांला वाटलें हा कऱ्हाडसारखाच प्रकार होतो कीं काय ! कऱ्हाडच्या मिनारावर चढून गेलों म्हणजे मिनाराच्या प्रवेशद्वाराला कुलूप लावून प्रेक्षकां-कडून कांहीं तरी पैसे काढल्यावांचून तें उघडायचें नाहीं असा तेथील मुसल्मान गुंडांचा रिवाज आहे. पण आम्हांला महालाच्या मागच्या बाजूनें भिंतीवर चढून बाहेर उडथा टाकून जातां येणें.

शक्य होतें. पण इतक्यांत रस्त्यावरून जाणाऱ्या कुणी सज्जनानें बाहेरची कडी काढल्यामुळें आमची सुटका झाली. यानंतर आम्ही **जोडघुमट** पाहिला. यांत विशेष पहाण्यासारखें कांहीं नाहीं. समोरासमोर एकमेकासारखे असलेले हे दोन घुमट सारख्या दिसणाऱ्या जुळ्या भावंडांची आठवण करून देतात, एवढेंच. यानंतर आम्ही पश्चिमेकडच्या तटाला गेलों. तेथें शेरझी बुरुजावर **मालिक-इ-मैदान** किंवा **मुल्क-इ-मैदान** ही तोफ ठेविली आहे ती पाहिली. ही तोफ पंचधातूंची ओतलेली आहे. हिच्या तोंडांत एका माणसाला बसून पागोटें बांधतां येतें. या तोफेविषयीं असें सांगतात, कीं पूर्वी पावसाळ्यांत आकाशांत ढग येत असूनहि पाऊस पडत नसे, तेव्हां ही तोफ उडवीत असत व मग पाऊस पडत असे.



# मालिक-इ-मैदान

मालिक-इ-मैदान (रण-स्वामिनी)चें महत्त्व उपयुक्ततेच्या दृष्टीनें कमी आहे. पण ओतीवकामाचा नमुना या दृष्टीनें तिच्या प्रचंड आकारमानाला तोड नाहीं. तिची लांबी १४ फूट ३½ इंच असून तोंडाचा व्यास ४ फूट ८½ इंच आहे. वजनांत ती ४२½ टनाहून थोडीशी जास्तच आहे. या प्रचंड रणस्वामिनीचा इतिहास फार मनोरंजक आहे. अहमदनगरांत बुऱ्हाणनिजामशहाच्या कारकीर्दींत (१५०८-१५५३) सन १५४९ मध्यें महंमद बिन हुसेन रूमि या तुर्कानें ही ओतली. ओतल्यानंतर रूमिखानानें स्वतःचा मुलगा तिला बळी दिला असें म्हणतात. १५६५च्या तालिकोटच्या लढाईत हिनें बराच पराक्रम गाजविला अशीहि माहिती सांपडते. पण वाहतुकीची अडचण लक्षांत घेतां ती खरी दिसत नाहीं. १५६४ त अलि-आदिलशहाचे ताब्यांत चांदबिबीच्या हुंड्याबद्दल सोलापूर व परांडा येथील किल्ले आले, त्या वेळीं ही परांड्याच्या किल्ल्यांत होती. परंतु महंमदशहाच्या ताब्यांत १६३२ त परांडा आला तेव्हां ही विजापूर-

क्र. ५०२१

करांचे ताब्यांत आली, तोंपर्यंत ती निजामशहांकडेच होती अशी माहितीसुद्धां आढळते. तें कसेंहि असले तरी १६३४ त ती विजापूरकरांकडे होती हें खास. कारण त्याच सालीं शहाजहाननें विजापूरकरांकडे हिची मागणी केली होती असा दाखला सांपडतो. १६३२ त मुरारी पंडितानें १० हत्ती, १४०० बैल आणि शेंकडों माणसें यांच्या सहाय्यानें ही परांड्याहून विजापुरीं आणली आणि शेरझी बुरुजावर तिची स्थापना केली. औरंगजेबानें विजापुरास वेढा दिला (१६८६) तेव्हां विजापूरकरांनीं हिचा उपयोग केला होता असें म्हणतात. त्या वेळीं हिच्या एका गोळ्यानें इब्राइम रोझ्याच्या व्हरांड्यांतील एक खांब ढांसळला असें सांगतात. पण हें खरें नसावें; कारण हिच्या गोळ्याची भूक एवढ्या क्षुल्लक खराबीनें शमली नसती. त्या काळीं हिच्या गोळ्याला लोक फार भीत असत. सोलापूरच्या किल्ल्याच्या तटांत १५ यार्ड रुंदीचें खिंडार हिनें पहिल्या गोळ्यांतच पाडलें, व दुसऱ्या गोळ्याला तटाचा एक भाग अजिबात ढांसळला. तेव्हां किल्ल्यांतील लोक शरण गेले अशी हिची कीर्ति आहे. उत्तरेंत १७६० त अहंमदशहा दुराणीनें ओतलेल्या

झमझमेचा जो दरारा होता तसाच दक्षिणेंत हिचा होता. सन १८२९ त साताऱ्च्या छत्रपतींनीं ही डागण्याचें ठरविलें तेंव्हां लोक घरें सोडून गेले होते. त्या वेळीं हिचीं गर्जना मेघगर्जनेशीं स्पर्धा करण्यासारखी झाली खरी, पण लोकांच्या अपेक्षेला ती उतरली नाहीं. १८४८ त ही इंग्रजांच्या ताब्यांत आली. तेंव्हां ती विलायतेस न्यावी असा सरकारचा विचार होता; परंतु समुद्रकिनाऱ्यापर्यंत ती वाहून नेण्याचा जबर खर्च ( ३०००० रु. ) व वाहतुकीच्या तज्ञांचा अभाव यांमुळें तो बेत रहित झाला; आणि आजतागायत तरी ही रणस्वामिनी प्रेक्षकांचा कुतूहलविषय व नागरिकांचें पूजास्थान होऊन राहिली आहे हें खरें. कारण अद्यापि विजापुरांतील हिंदु लोक हिची भक्तिभावानें पूजा करितात; आणि हिंदूंचा ' भोळा भाव ' लक्षांत घेतां ते हिला नवसहि करीत असावेत, व ही आपल्या भोळ्या भगत-गणावर सुप्रसन्न होऊन त्याच्या नवसासहि पावत असावी असें वाटतें.

या तोफेवर तीन लेख कोरलेले आढळतात. एकांत ही ओतणाऱ्या कारागिराचें ( महंमद बिन हुसेन रूमी ) नांव सांपडतें; दुसऱ्यांतहि ओतल्याचा काल ( इ. स.

१५४९ ) व अबदुल गाझी निजामशहाचें नांव सांपडतें; व तिसऱ्यांत औरंगजेबानें विजापूर हस्तगत केल्याचा ( इ. स. १६८५–८६ ) उल्लेख आहे.

इ. स. १८५४ त हिचें ( मालिक-इ-मैदान या तोफेचें ) दुर्दैव ओढवण्याचा समय आला होता. त्या सालीं साताऱ्च्या कमिशनरसाहेबांनीं विजापुरांतील निरुपयोगी सरकारी मालाचा लिलांव करण्याचा हुकूम काढला होता; त्या वेळीं तेथील मामलेदारानें हा हुकूम अक्षरशः पाळण्याच्या भरांत ही तोफ लिलांवांत काढली; पण १५० रुपयांवर लिलांव चढेना, तेव्हां त्यानें तसें कमिशनरसाहेबांस कळविलें; त्यावर कमिशनरसाहेबांनीं लिलांव रद्द ठरविला.

अहंमदनगरच्या किल्ल्यांत ही तोफ ओतली तेव्हां तिच्याबरोबरच ‘ कडक बिजली ’ नांवाची दुसरी एक तोफ ओतली होती. असें म्हणतात कीं, या दोन प्रचंड तोफा तालिकोटच्या लढाईसाठीं नेल्या होत्या; परंतु वाटेंत कृष्णेच्या पात्रांत ‘ कडक बिजली ’ रुतून बसली ती कांहीं केल्या निघेना. ही तोफ जेथें बुडाली तथें ती पाण्यावर दिसते; व भाविक लोक तिची पूजा-अर्चा करितात असें कांहीं लोकांच्या सांगण्यांत येतें.

असो. ही तोफ पाहिल्यानंतर आम्ही धर्मशाळेंत येऊन दशम्या खाल्ल्या व थोडा वेळ विश्रान्ति घेतली.

दुपारीं पुन्हां प्रेक्षणीय स्थळें पहाण्यास बाहेर पडलों. प्रथम **ताजवावडी**कडे गेलों. ही चौकोनी विहीर २२३ फूट लांब, तितकीच रुंद व ५० फूट खोल असून पुण्याच्या टिळक-तलावापेक्षां किती तरी मोठी आहे. ही १६२० त महंमदशहानें राणी ताजच्या सन्मानार्थ बांधविली.* विहिरीच्या चारी बाजूंनीं तट आहेत, व तटाच्या आंतल्या अंगानें

* ही वावडी मलिक संदलानें 'ताज सुलताना' राणीसाठीं बांधली असें कांहींचें म्हणणें आहे; तर कांहींचें म्हणणें असें आहे कीं, मलिक संदलाच्या बाबतींत बादशहाच्या हातून कांहीं अन्याय झाल्यामुळें बादशहानें त्यास कांहींहि मागण्यास सांगितलें; तेव्हां त्यानें आपलें नांव चिरस्मरणीय करण्यासाठी ही बावडी बांधण्याची परवानगी मागून घेतली. तिच्या बांधकामासाठीं खुद्द बादशहानें पैसा पुरवला असें म्हणतात. पण हें खरें नसावें; कारण मलिक संदलानें कांहीं तरी शिलालेख अवश्य कोरून ठेवला असता.

चौफेर सातआठ फूट रुंदीचा रस्ता आहे. विहिरीच्या तटाच्या बाहेरच्या ओऱ्यांतून उर्दू शाळा भरते. विहिरीवर एकदोन मोटा चालतात, पण त्यानें व्हावा तसा उपसा होत नसल्यामुळें पाण्याला हिरवा रंग आला आहे. पूर्वी विहिरींत पोहण्याची मनाई नसे, पण ती हल्लीं आहे. याचें कारण कांहीं अनभ्यस्त पोहणारांना विहिरींत धोका झाल्याचीं उदाहरणें घडलीं. पण त्यानें चांगल्या सराइत पोहणारांचा उत्साहभंग करणारी मनाई सर्वांवर सारखीच लादली गेली. तेथें ‘ दशाननोऽहरत् सीतां बंधनं च महोदधेः ’ या सुभाषिताची आठवण झाली. दुष्टानें केलेल्या पापाचें फळ सुष्टांना भोगावें लागतें, हा दंडक प्राचीन काळापासूनचा दिसतो. विहिरींत कदाचित् खरोखरीच थोडासा धोका असावा, बिलकूल नसेल असें म्हणवत नाहीं. बेगम तलाव, तौरवी तलाव, पाण्याचा नळ, चांदबावडी व ताजबावडी यांवरून या राजधानीस पाणीपुरवठ्याच्या योजना कोणत्या केलेल्या होत्या हें दिसून येतें.

## इब्राइम-रोझा

ताजबावडीनंतर आम्ही पश्चिमेस गांवाचे बाहेर जवळच असलेल्या **इब्राइम रोझ्या**कडे गेलों. ही इमारत भव्य व सुंदर असून येथें दुसऱ्या इब्राइम आदिलशहाची कबर असल्यामुळें तिला हें नांव प्राप्त झालें आहे.

रोझा याचा अर्थ उद्यान असा आहे. आदिलशाहीच्या काळांत या कबरीच्या भोंवतालीं सुगंधी लतापुष्पांनीं मंडित असा उत्कृष्ट बाग होता; हल्लीं तेथें गवताचें साम्राज्य माजलें आहे. ज्या ठिकाणीं पूर्वी वैभवसंपन्न राजघराण्यांतील स्त्रीपुरुष विहार करीत असत त्या ठिकाणीं हल्लीं तेथील मुसलमान रक्षकाच्या म्हशी चरत असतात. ' कालाय तस्मै नमः !'

या प्रेक्षणीय इमारतींतील दगडी कोरीवकामाची कलाकुसर अप्रतिम आहे. एका विस्तृत चौथऱ्यावर मध्यभागीं एक पुष्करणी असून तिच्या एका बाजूस ही इमारत आहे. इमारतीच्या गाभ्यांत इब्राइम व त्याचे नातलग यांचीं थडगीं आहेत.

या इमारतींतील थडगीं पूर्वेकडून पश्चिमेकडे इब्राइम पादशहाची राणी ताज सुलताना, त्याची आई हाजी बडी साहेब इब्राइम बादशहा, त्याची मुलगी झोरा सुलताना, त्याचे मुलगे दरवेश पादशहा व सुलतान सुलेमान यांचीं आहेत. स्त्री-पुरुषांचीं थडगीं ओळखणें सोपें आहे. स्त्रियांच्या थडग्याचा माथा साफ गुळगुळीत असतो, व पुरुषांच्या थडग्यावर वेलबुट्टी असते. थडग्यांत प्रेताचें डोकें उत्तरेकडे करून, उजव्या कुशीवर निजवून तोंड मक्केच्या बाजूला केलेलें असतें.

इब्राइम रोझा इमारतीच्या दरवाजावर खालील शिलालेख आढळतो:—

"या इमारतीची उंची पाहून स्वर्गांत आश्चर्य वाटलें; किंबहुना या इमारतीचें शिखर पृथ्वीपासून इतकें उंच झालें आहे कीं या ठिकाणीं दुसरा स्वर्गच उभारला आहे असें वाटतें. नंदनवनानें येथल्या बागे-पासून सौंदर्याची उसनवारी केली आहे. स्वर्गांतल्या एका परीनें या इमारतीच्या बांधकामाचा काल खालील वाक्यानें जाहीर केला, 'ही इमारत हृदयाल्हादक असून हिच्यांत ताज सुलतानाचें स्मारक आहे.' या

वाक्यावरून इ. स. १६२६ चा बोध होतो. या लेखावरून असें दिसतें कीं ही इमारत मुख्यतः ताज सुलतानाच्या थडग्यासाठीं बांधली, परंतु तिचा नवरा इब्राइम तिच्या आधीं मृत्यु पावल्यामुळें त्याचें प्रेत येथें पुरलें आहे. जुन्या ग्रंथांतून हिचा उल्लेख 'ताज सुलतानाचें थडगें' या नांवानेंच केलेला आढळतो.

पुष्करणीच्या दुसऱ्या बाजूस एक प्रार्थना-मशीद आहे. ह्या मशिदीचें कामदेखील कबरीइतकें नसलें तरी एकंदरींत वाखाणण्यासारखेंच आहे. मशिदीचा एक कोपरा पडावयास झाला असल्यानें तेथें एक धोक्याची पाटी लावली आहे.

इब्राइम रोझ्याच्या पलीकडे पश्चिमेस मैल-दीड मैलावर **मोती-मशीद** नांवाची एक लहान पांढरी मशीद दिसते. मशीद अगदींच लहान असून तिला सांप्रतचें नांव प्राप्त होण्याचें कारण असें सांगतात, कीं आदिलशाहीच्या पूर्वी या ठिकाणीं पीर मौलवी हबीबुल्ला या नांवाचा एक मुसलमान अवलिया रहात होता. या वेळीं विजापुरावर बहामनी राजा हुमायून (स. १४५७ ते १४६१) याची सत्ता होती. त्या वेळीं विजापुरांतील एका सरदाराची संपत्ति इतकी वाढली

कीं इतर सरदार त्याचा हेवा करूं लागले; आणि त्याचा नाश घडवून आणण्याच्या तयारीस लागले. तेव्हां त्या सरदार-घराण्यांतील स्त्रियांनीं आपल्या दागिन्यांतील मोत्यांची भुकटी केली व ती पीर मौलवी-जवळ आणून दिली. पीर मौलवी कधीं कधीं अद्‌भुत चमत्कार करून दाखवीत असे, त्यामुळें विजापुरांतील लोकांची त्याच्यावर श्रद्धा होती. एकदां पीरसाहेब आपल्या शिष्यावरोबर बुद्धिबळें खेळत होते. खेळतां खेळतां पीरसाहेबांनीं एकदम समाधि लावली, व ती चांगली तासभर टिकली. समाधी उतरल्यावर पीर-साहेब म्हणाले, "माझा एक खलाशी मित्र इरा-णाच्या आखातांत वादळांत सांपडला होता; त्यानें माझें स्मरण केल्यामुळें मी तिथें जाऊन त्याची संक-टांतून सुटका करून आलों." शिष्याला हें खरें वाटेना; तेव्हां पीरसाहेबांनीं आपल्या अंगावरचे कपडे पिळून दाखविले, तों त्यांतून समुद्राचें खारें पाणी निघालें. शिष्यानें तो दिवस व वेळ टिपून ठेवली. पुढें तो खलाशी विजापुरास आला तेव्हां त्यानें आपल्या वाद-ळांतील संकटाची वेळ सांगितली, आणि दोन्ही वेळा जुळून आल्या. या चमत्कारामुळें पीरसाहेबांची कीर्ति

वाढली. पुढें १४६०त पीरसाहेब वारले, तेव्हां त्यांची कबर या ठिकाणीं बांधलेली आहे, व कबरीच्या घुमटाच्या आंतल्या बाजूनें त्या मोत्यांच्या भुकटीचा चुना दिलेला आहे. अजूनहि विजापुरांतील मुसलमान हें स्थान पूज्य मानतात. या मशिदीच्या भिंतीकडे निरखून पाहिलें तर थोडी थोडी चमक दिसते खरी, पण ती खरोखरीच मोत्यांची आहे किंवा शिंपांची आहे याची जबरदस्त शंका येते.

ही मशीद पाहून आम्ही परत गांवांत आलों व उत्तरेकडील **उपल्या बुरुजा**कडे आपला मोर्चा वळविला. हा बुरूज बराच मोठा, गोल व ६८ फूट उंच आहे. एका गवळणीनें उपल्या ( गोवऱ्या ) विकून त्या पैशावर हा बांधला आहे, अशा आख्यायिकेमुळें ह्यास उपल्या-बुरूज म्हणतात. ही आख्यायिका उपली शब्दाचा अर्थ गोवरी असा होतो एवढ्यावरूनच प्रचलित झालेली दिसते. खरा इतिहास असा आहे, कीं पहिल्या अली-आदिलशहानें ( १५५७ ते १५८० ) तालिकोटच्या लढाईनंतर आपल्या सर्व सरदारांस शहराभोंवतालच्या तटाच्या बांधणीकरितां जागा नेमून दिल्या. या वेळीं अलीचा

सेनापति हैदरखान बेळगांव—धारवाडकडे लढाईंत गुंतला होता. तो विजापुरीं परत येईपर्यंत सर्व तट व बुरूज बांधून झाले होते. तेव्हां हैदरखानास राग आला; कारण त्याच्याकरितां तटाचा भाग राखून ठेवला नव्हता. अलीनें त्याला उत्तरेकडची जागा देऊन सर्वांत उंच बुरूज बांधण्यास सांगितलें. तोच हा ' उपली बुरूज ' होय.

पश्चिमेकडून या बुरुजावर तोफेचा मारा झाला असावा असें त्या बाजूच्या पडझडीवरून दिसतें. पश्चिमेस जवळच असलेल्या मालिक-इ-मैदान तोफेवर शत्रूंनीं मारलेला तोफेचा गोळा चुकून या बुरुजावर येत असावा.

ह्या बुरुजाच्या बांधण्यांत असें एक चमत्कारिक प्रमाण आहे कीं ह्याची उंची व व्यास हीं दोन्ही सारखीं, इतकेंच नाहीं पण तंतोतंत आहेत. मग ह्यांत काय हेतु असेल तो ईश्वर जाणे ! २१३ फूट परिघाच्या या अफाट बुरुजावर मोकळेपणीं हिंडावें तों एकसारखा घो घो वारा वहात असतो, व त्यामुळें अंगावरील वस्त्रांचा फडफड आवाज होतो.

बुरुजावरून शहराचा देखावा चांगला दिसतो. वर दोनतीन मोठाल्या लांबलचक तोफाहि पडलेल्या आहेत. वायव्येकडची सोलापूर बाजूनें होणारी शत्रूंची चाल या बुरुजावरून तोफांच्या भडिमारानें चांगलीच रोखतां येत असावी.

बुरुजानंतर आम्ही **बारा कमानी** ही इमारत पाहिली. या इमारतीचें काम अर्धवट राहिलेलें आहे. एका २० फूट उंच, २०० फूट लांब व २०० फूट रुंद चौकोनी चौथऱ्यावर सात-सात कमानींच्या अशा सात सारख्या रांगा आहेत, व अगदीं मध्यभागीं तेवढी एक कमान नसल्यानें एकंदर ४८ कमानी असून कोणत्याहि एका बाजूच्या कमानी मोजल्या तर त्या बारा भरतात. यावरूनच इमारतीस हें नांव पडलें आहे. मध्यभागीं चौकांत एक थडगें आहे, तें दुसऱ्या अल्ली आदिलशहाचें ( १६५६–१६७२ ) होय.

## आसार-महाल

सात-मजली हा पूर्वीचा आदिलशहाचा राजवाडा. आतां जिल्ह्याच्या सर्व कचेऱ्यांसाठीं उपयोगांत आणला आहे. ही इमारत सात-मजली आहे हें नांवावरून लक्षांत येतेंच. यानंतर आम्ही **आसार-महाल** पहाण्यास गेलों. हा महाल स्टेशन-रस्त्यावर पूर्वाभिमुख असून त्याच्यासमोर एक पुष्करणी आहे. दर्शनी भागांत चारपांच लांकडी खांब आहेत, त्यांची उंची पस्तीस फूट असून घेर सुमारें दहा फुटांचा आहे. महालाच्या दुसऱ्या मजल्यावर बादशहाचीं वस्त्रें कांचेच्या कपाटांत जपून ठेवलीं आहेत, तीं तेथील मुसलमान रक्षकानें आम्हांस दाखविलीं. या मजल्यावरच्या कांहीं खोल्यांतून भिंतींवर व छतावर उत्कृष्ट तैलचित्रांचे नमुने पहावयास सांपडतात.

हीं चित्रें युरोपियन चित्रकारांनीं काढलेलीं आहेत असें म्हणतात; कारण धार्मिक मुसलमानांना चित्रें खपत नाहींत; म्हणूनच सुलतान महंमदानें हीं चित्रें युरोपियन चित्रकारांकडून काढविलीं असें सांगण्यांत येतें. औरंगजेबानें रागानें या सर्व चित्रांची खराबी केलेली आहे.

हा महाल ( आसार महाल ) सुलतान महंमदानें न्यायसभेसाठीं बांधविला होता, पण शहाजहान बादशहानें 'किल्ल्याच्या बाहेर न्यायालय असतां कामा नये' असें फर्मांविल्यामुळें सुलतान महंमदानें येथें न्यायसभा न भरतां महंमद पैगंबराचा पवित्र अवशेष आणून ठेवला.

एका खोलीला सीलबंद कुलूप लावलें असून आंत महंमद पैगंबराची 'निशाणी' म्हणून त्याच्या दाढींतील दोन केंस एका पेटींत घालून ठेवले आहेत. ती पेटी फक्त वर्षांतून एक दिवस पहावयास मिळते. या दिवशीं येथें मोठा उरूस—जत्रा भरते; व गांवोगांवचे मुसलमान त्या निशाणीच्या दर्शनाकरितां येथें येतात.

पुष्कळ वर्षांपूर्वीं या खोलींत चोरट्यांनीं प्रवेश केला व तेथल्या वस्तु इकडच्या तिकडे केल्या. त्या वेळीं चोरट्यांनीं या सोनेरी पेटींतील वस्तूला हात घातला नव्हता असें कांहीं खात्रीनें सांगतां येणार नाहीं; परंतु सांप्रत विजापुरांतील मुसलमान ही पेटी कधीं उघडून पहात नाहींत. आपली प्रिय वस्तु नाहींशी झालेली पहाणें आपल्या नशिबीं येऊं नये

अशी त्यांची इच्छा दिसते. शिवाय येथील रक्षक वगैरे लोकांना या पेटीच्या दर्शनार्थ येणाऱ्या लोकांकडून उत्पन्न मिळण्याची आशा असल्यामुळें तेहि कधीं ही पेटी उघडून पहाण्याच्या भानगडींत पडत नाहींत.

इतकीं स्थळें पाहून होईपर्यंत संध्याकाळ आली. मुख्य मुख्य ऐतिहासिक स्थळें हीं एवढींच. शाळा, इस्पितळें इत्यादि जिल्ह्याच्या ठिकाणीं असणाऱ्या सर्व संस्था येथें आहेत, पण त्या पहाण्यांत कांहीं विशेष स्वारस्य नाहीं. विजापूरचा तुरुंग मात्र पहाण्यासारखा आहे, पण तो गांवापासून लांब असल्यामुळें तो पाहून येण्याइतका वेळहि राहिला नव्हता. म्हणून आम्ही येथील एडवर्ड पार्कमध्यें फिरावयास गेलों. स्टेशन-रस्त्याच्या एका बाजूला आसार-महाल व दुसऱ्या बाजूला हा पार्क आहे. पार्कच्या मध्यभागीं एडवर्ड बादशहाचा संगमरवरी पुतळा आहे. पूर्वी येथें कारंजें होतें. हल्लीं पार्कचा उपयोग फिरावयास येणाऱ्या लोकांना व क्रीडांगण म्हणून खेळाडूंना होतो. आतां फिरतां फिरतां आदिलशहाच्या या राजधानीच्या इतिहासाचें म्हणजेच पर्यायानें आदिलशाहीच्या इतिहासाचें निरीक्षण करूं या.

# ऐतिहासिक पर्यालोचन

विजापूर अथवा विजयपूर हें शहर बिक्कनहळ्ळी या नांवाच्या जुन्या खेड्याच्या जागेवर वसलेलें आहे. येथें सांपडलेल्या अकराव्या, बाराव्या किंवा तेराव्या शतकांतील शिलालेखांतून विजयपूरचा उल्लेख सांपडतो. या अवधींत विजापुरावर चालुक्य घराण्यांतील राजे व देवगिरीचे यादव यांची सत्ता होती. जैतुगी यादवानें विजयपुरास आपली राजधानी केली होती. असें ११९६ च्या एका शिलालेखांत सांपडतें. तेराव्या शतकाच्या अखेरीस विजयपूर मंगळवेढेकरांच्या ताब्यांत होतें; व मंगळवेढ्याच्या विजनरावानें एका मुसलमान साधूस विजयपुरांत मशीद बांधण्यास परवानगी दिली होती, असें दुसऱ्या एका शिलालेखांत आढळतें. यावरून हिंदु राजांच्या कारकीर्दीतसुद्धां विजयपूर हें कांहीं तरी महत्त्वाचें स्थान होतें यांत शंका नाहीं. चौदाव्या शतकापासून विजयपुरावर मुसलमानांचा अंमल सुरू झाला. अल्लाउद्दीन खिलजीचा सरदार मलिक काफूर हा विजापूरचा पहिला मुसलमान सत्ताधीश होय. पंध-

राव्या शतकांत विजापूर बहामनी राजांच्या ताब्यांत होतें. १४८१ त बहामनी राजाचा सरदार युसफ आदिलखान याचा अंमल विजापुरावर होता. युसफनें १४८९ त बहामनी राजाची सत्ता झुगारून देऊन विजापुरास स्वतंत्र राज्य स्थापिलें व राजचिन्हें धारण केलीं. आदिलशाहीचा संस्थापक हाच युसफशहा होय. याची सारी कारकीर्द बेदरच्या अमीर बेरिदाशीं, अहमदनगरच्या निजामशहाशीं व विजयनगरच्या हिंदु राजाशीं झगडून आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यांत गेली; तथापि युसफशहानेंच विजापूर शहराची स्थापना केली, बाजार भरविला, राजवाडा व अजस्र तट बांधले, पूर्वेस अल्लापूर नांवाचें उपनगर वसविलें, आणि सोलापूर, परांडा, मिरज येथील किल्ल्यांचीं विशाल व मजबूत कामें केलीं. याच्या अमदानींत १५०३ मध्यें वॉरथेमा नांवाचा इटॅलियन प्रवासी विजापुरास आला होता; त्यानें ' हें शहर मोठें सुंदर, त्याची तटबंदी मजबूत व त्यांतील घरें भव्य असून, राजवाड्यांतील ४४ खोल्या ओलांडाव्या तेव्हां बादशहाची भेट होई ' असें वर्णन केलें आहे. युसफशहाच्या मृत्यूनंतर

## विजापूर—

१५१० त इस्मायलशहा गादीवर आला. यालाहि आपल्या कारकीर्दीत बेरिदाशीं व निजामशहाशीं वारंवार युद्धें करावीं लागलीं. बुऱ्हाण निजामशहाला इस्मायलशहानें आपली वहीण मुरियम सुलताना दिली, व हुंड्याबद्दल सोलापूरचा किल्ला व त्यासोबतचे साडेपांच परगणे देण्याचें कबूल केलें; पण त्यानें हा करार पाळला नाहीं. निजामशहानें सोलापूर घेण्यासाठीं दोनदां विजापूरकरांवर स्वारी केली. पण इस्मायलशहानें त्याचा पराभव करून सोलापूर आपणांकडे ठेवण्याचा ठराव करून घेतला. विजापूरच्या पश्चिमेस इस्मायलशहानें शहापूर नांवाचें उपनगर वसविलें. त्याच्या पश्चात् १५३४ त मल्लू आदिलशहा राज्यारूढ झाला. पण तो त्याच सालीं पदच्युत झाल्यामुळें इब्राइमशहाला गादी मिळाली. १५४३ त निजामशहानें विजयनगरशीं तह करून व कुतुबशहाशीं दोस्ती जमवून विजापूरच्या मुलुखांत स्वारी केली. या वेळीं इब्राइमशहाचा वृद्ध व इमानी प्रधान आसफखान यानें भांडणाचें मूळ जो सोलापूरचा किल्ला व त्यासोबतचा महाल तो निजामशहास देऊन एकट्या कुतुबशहाशीं युद्ध केलें, आणि त्याचा पूर्ण

पराभव केला. इब्राइमशहाच्या कारकीर्दींत आदिलशाहीला हे व असेच आणखी पुष्कळ विजय मिळत गेले व तिची सत्ता पुष्कळ वाढली. इब्राइमशहाच्या पश्चात् १५५७ मध्यें अल्ली आदिलशहा गादीवर आला. त्यानें शहापूर उपनगराची वाढ करून त्याला शहराचा दर्जा प्राप्त करून दिला. निजामशहाशीं व कुतुबशहाशीं लढण्याकरितां अल्लीशहानें विजयनगरच्या रामराजाची मदत घेतली; पण हिंदु सैन्याचा चढेलपणा सहन न होऊन हे सर्व मुसलमान शहा आपसांतील भांडणें विसरून एकत्र झाले व त्यांनीं १५६५ त तालीकोटी येथें घनघोर युद्ध करून तें प्राचीन हिंदु राज्य धुळीस मिळविलें! यानंतर अल्लीशहानें विजयनगरच्या मुलुखावर हात मारून बराच राज्यविस्तार केला, व दहा वर्षें शान्ततेंत काढून राज्याची अंतर्व्यवस्था लाविली. गगनमहाल, जुम्मा-मशीद, चांद-बावडी, तोरवी तलाव हीं कामें या शान्ततेच्या कालांतच झालीं. शिवाय अल्लीशहानें विजापूर शहराभोंवतीं मोठा विस्तृत तट व जागोजागीं बुरूज आपल्या सरदारांकडून बांधवून घेतले. १५८० त अल्लीचा खून झाल्यावर दुसरा इब्राइमशहा गादीवर आला. या

सुमारास दिल्लीच्या मोगल सम्राटाचें—अकबराचें—लक्ष या दक्षिणेंतील मुलुखाकडे वळलें, व निजामशहावर मोगलांचे हल्ले येऊं लागले. अशा वेळीं इब्राइमशहानें फार दूरदर्शी धोरण बाळगून आपल्या चुलतीला—चांदबिबीला मोगलांविरुद्ध मदत केली, व तिच्या पश्चात् मलिकंबरला प्रत्यक्ष नाहीं तरी तटस्थवृत्ति स्वीकारून अप्रत्यक्षरीत्या मदतच केली. इब्राइमशहाच्या कारकीर्दीत १५८३ मध्यें फिच् व न्यूबेरी हे दोन इंग्लिश प्रवासी विजापुरास आले होते. त्यांनीं ‘ विजापूर हें मोठें सुंदर शहर असून त्यांत सोनें, चांदी, जवाहीर यांचा मोठा संचय होता ’ असें वर्णन केलें आहे. १६०० चे सुमारास इब्राइमशहानें विजापूरच्या पश्चिमेस चार मैलांवर नवरसपूर नांवाचें उपनगर वसवून तेथेंच आपली राजधानी नेण्याच्या उद्देशानें राजवाडे वगैरे बांधण्यास सुरवात केली. अर्धेअधिक बांधकाम झाल्यावर ज्योतिषांच्या सांगण्यावरून बादशहानें नवरसपुरास राजधानी करण्याचा बेत रहित केला; तरी पण बादशहा तेथें मधून मधून जाऊन रहात असे. इब्राइमशहाच्या वेळीं विजापूरचें वैभव अपरंपार वाढलें. १६०४ मध्यें मुसलमान इतिहासकार आसाद-

बेग यानें विजापूर शहरांतील गगनचुंबी इमारतींचें, राजवाड्यांचें, तटबंदीचें व बाजाराचें मोठें बहारीचें वर्णन केलें आहे. तीस यार्ड रुंद व चार मैल लांब अशा त्या वेळच्या तेथल्या बाजारांत तलम कापडाचीं, अमूल्य जवाहिरांचीं, तीक्ष्ण शस्त्रास्त्रांचीं, उंची मद्यांचीं आणि किंमती सुगंधांचीं अशीं नानाविध असंख्य दुकानें होतीं. रस्त्यांत एखाद्या जत्रेप्रमाणें लोकांची वर्दळ सारखी असे. आदिलशहाच्या अमदानींत इब्राइमशहाची कारकीर्द सर्वांत जास्त लांब ( ४६ वर्षांची ), प्रजेला सुखी व बादशहातीला वैभवशाली अशी झाली. ह्यानेंच सात मजली, आसार महाल, नवरस महाल, इब्राइम रोझा इत्यादि भव्य, प्रेक्षणीय व कलापूर्ण कामें उठवून विजापूरच्या सौंदर्यांत अमूल्य भर टाकली. ह्यानेंच सरकारी हिशोबाच्या कामीं फारशीच्या-ऐवजीं मराठी भाषा उपयोगांत आणली. हा हिंदु झाला होता; व दरबारी कामांतसुद्धां हिंदु आचार पाळी असें विजापूरचे मुसलमान मानतात. ह्याच्या हिंदुत्वाची गोष्ट गुरु-चरित्रांतील ९ व्या व ५० व्या अध्यायांतील कथेशीं बहुतांशीं जुळते.


इब्राइमशहाच्या मृत्यूनंतर १६२६ त महंमद-

शहा गादीवर आला. याच्या कारकीर्दीत मोगलांशीं युद्धाचे प्रसंग आले. निजामशाही नष्ट झाल्यावर शहाजी विजापूरकरांकडे आला व त्याच्या पराक्रमामुळें आदिलशाहीची सत्ता कर्नाटकप्रान्तीं वृद्धिंगत झाली. १६३८–३९ त फ्रेंच प्रवासी मँडेल्सो हिंदुस्थानांत आला होता. त्यानें आशियांतील मोठ्या शहरांत विजापुराची गणना करून त्या वेळीं 'विजापुरास लागून पांच समृद्ध उपनगरें होतीं, शहराच्या तटावर १००० तोफा होत्या, शहराचा घेर १५ मैल होता व शहरांतील बाजारांत अमूल्य जवाहीर होतें' असें वर्णन केलें आहे. या वेळीं विजापूरची लोकसंख्या उपनगरांसुद्धां वीस लाख होती. महंमदशहाच्या वेळीं विजापूर वैभवाच्या पुरांत डुंबून राहिलें होतें. बादशहा नुसता शहरांत फिरावयास गेला तरी लोक त्याच्यावर सोन्यारुप्याचीं फुलें उधळीत, असें म्हणतात. त्याच्या सैन्यांतील शेंकडों हत्ती रत्नभूषणांनीं शृंगारलेले असत; आणि हजारों घोड्यांच्या जिनांत हिरे, मोत्यें, माणकें लटकलेलीं असत असें त्याच्या ऐश्वर्याचें वर्णन आढळतें. महंमदशहाची औदार्याबद्दल पुष्कळ ख्याति होती. हा वारंवार द्रव्याची


तुला करून गोरगरीब व फकीर यांना वांटी. महंमदशहा-नंतर दुसरा अल्लीशहा १६५६ मध्यें राज्यारूढ झाला.

याच सालीं औरंगजेबानें विजापुरास वेढा दिला, पण शहाजहान अत्यवस्थ असल्याची बातमी आल्यामुळें तो वेढा उठवून उत्तरेंत गेला. १६५९ पासून शिवाजीशीं युद्धें सुरू झालीं. अफजुलखानाचा वध व शिद्दीजोहारची पन्हाळ्यास फसगत झाल्यावर शिवाजीशीं तह झाला. १६६६त जयसिंहानें शिवाजी-च्या साह्यानें विजापुरास वेढा दिला; पण पुढें पाण्याचा तुटवडा पडला, छावणींत आजार उद्भवला, विजापूरकरांची रसद मारून नेण्याची पद्धति जाचक झाली, शिवाजी आग्र्यास गेल्यावर त्याची मदत बंद पडली, आणि विजापूरकरांस कुतुबशहाची कुमक आली इत्यादि कारणांमुळें हा वेढा अयशस्वी होऊन आदि-लशाहीचें आजचें मरण उद्यांवर गेलें. शिवाजी आग्र्याहून परत आल्यावर त्यानें केलेली हुबळी शह-राची लूट, हंसाजी मोहित्याचें युद्ध व प्रतापराव गुजराचा पराक्रम, शिवाजीची कर्नाटकांत स्वारी इत्यादींमुळें आदिलशाहीचें बरेंच नुकसान झालें. अल्लीशहाच्या कारकीर्दीत विजापूर प्रान्तांतून सोन्याचा

धूर निघत होता, पण आदिलशाहीच्या माध्यान्हीचा वैभवसूर्य मावळतीकडे कलला तो याच्याच कारकीर्दीत; आणि पुढील शहाच्या कारकीर्दीत तर तो पूर्ण अस्तास गेला. अलीशहाच्या मृत्यूनंतर अल्पवयी शिकंदरशहा १६७२ त गादीवर आला, तेव्हां औरंगजेबानें विजापूर दरबारांत भेदनीति चालविली. १६७८ मध्यें मोगल दरबारच्या वकिलानें पादशहाबिब्बीची मागणी केली, व खुद्द विजापुरांत युद्धाचा संभव उत्पन्न झाला; पण बिब्बीनें स्वतः मोगलांच्या स्वाधीन होऊन आपल्या भावावरचें व त्याच्या राज्यावरचें संकट टाळलें, आणि आदिलशाहीच्या मरणाला रात्र आडवी केली. पुढील सालींच विजापुरास दिलेरखानाचा वेढा पडला, पण शिवाजीचें साहाय्य मिळालें म्हणून तो उठला. शिवाजीच्या मृत्यूनंतर स्वतः औरंगजेब दक्षिणेंत स्वारीवर आला, तेव्हां त्यानें राजपुत्र आजमशहास विजापूरकरांवर धाडलें. आजमशहानें १६८४ त सोलापूरच्या किल्ल्यास वेढा दिला व पुढील सालीं तो सरहि केला. पुढें आजमशहानें खुद्द विजापुरास वेढा घातला; पण विजापूरकरांनीं त्याचा सोलापुराशीं असलेला संबंध तोडला,



सात मजली



असार महाल

त्यामुळें त्याला तो उठवावा लागला; आणि औरंगजेबाकडून त्याला धान्याची मदत वेळेवर आली नसती तर त्याच्या सैन्यावर उपासमारीची वेळ येणार होती. १६८६ त औरंगजेबानें स्वतः विजापुरास वेढा घातला व भेदनीति चालविली. त्याच्या तोफांनीं विजापूरच्या तटांत खिंडार पाडलें, तरी पण विजापूरचे लोक मोठ्या शौर्यानें लढले. पण शेवटीं अन्नाची तूट पडल्यामुळें त्यांना शरण जावें लागलें. औरंगजेबानें दक्षिणेकडील दरवाजानें शहरांत मोठ्या उत्साहानें प्रवेश केला व त्या दरवाजास 'फत्ते-दरवाजा' असें नांव दिलें. विजापुरांतील पौरजनांनीं या मोगल सम्राटाच्या स्वागतार्थ केशराऐवजीं रस्त्यावर अश्रूंचे सडे टाकले, व जयवाद्यांच्याऐवजीं वातावरण मुक्तकंठ रुदनानें निनादित केलें! ज्या राजघराण्याशीं शरीरसंबंध जोडण्यांत दिल्लीच्या मोगल बादशहातीनें भूषण मानिलें, त्या राजघराण्यांतील शेवटच्या पुरुषाला—तरुण शिकंदरशहाला—जित बादशहाप्रमाणें नव्हे तर एखाद्या क्षुद्र बंडखोराप्रमाणें वेड्या घालून औरंगजेबापुढें आणण्यांत आलें! मोत्यांचा चारा खाणाऱ्या मानस-सरोवरांतील राज-

हंसाला बेडकांच्या पंकमय डबक्यांत राहून दिवस काढण्याची पाळी आली ! औरंगजेबानें शिकंदरशहास आपल्या छावणींत मृत्यूपर्यंत कैदेंत व आदिलशाहीच्या पुष्कळ सरदारांस आपल्या चाकरींत ठेवलें. या वेळेपासून उन्नतिशिखरावर पोंचलेलें विजापूर अवनतीच्या उतरणीस लागलें.

औरंगजेबानें विजापूर काबीज केलें त्या प्रसंगाचें वर्णन गाइकवाडांनीं मोठ्या बहारीनें केलें आहे. तें असें—

" आदिलशाही ज्या वेळीं ऐन भरभराटींत होती त्या वेळीं एखादे सणावाराचे दिवशीं बादशहाची स्वारी शहरांत निघाली असतां सर्व शहर कसें इंद्रभुवनाप्रमाणें शृंगारलेलें दिसे. जागजागीं गुढ्या उभारलेल्या व तोरणें बांधलेलीं असत. शहरांतील सर्व मार्गांवर चंदनाचे व कुंकुमाचे सडे घालीत व त्यांजवर चित्रविचित्र रांगोळ्या काढिलेल्या असत. शहरभर चिराकदान करीत व नगरवासी स्त्रिया उत्तम वस्त्रालंकार लेवून पंचारती घेऊन, आपआपल्या वाड्याच्या दुमजल्या-तिमजल्यावर उभ्या असत; आणि स्वारीचा थाट व शोभा डोळे भरून पहाण्याकरितां मार्गांवर सर्व

आबालवृद्ध प्रजा लोटलेली असे. बादशहाची स्वारी ज्या ज्या मार्गावर जाई त्या त्या मार्गावर नागरिक-लोक जयजयकारप्रदर्शक सोन्यारुप्याचीं फुलें उधळीत, त्यानेंच सर्व रस्ता भरून जात असे. नंतर बाद-शहाची स्वारी आंतल्या किल्ल्यांत परत शिरतांच सलामीच्या तोफांच्या आवाजानें सर्व शहर दणाणून जाई. परंतु हल्लीं त्याच **आदिलशाही राजधानींत** सर्व शहरभर मोगल सैन्य पसरलेलें असून तिचा स्वामी जो बादशाहा शिकंदर आदिलशाहा तो कोठें दृष्टीस पडेना ! यामुळें ज्या राजधानींत पूर्वी आनंदानें उत्सव व्हावयाचा तेथें सर्वत्र आक्रोश व हाहाःकार यांनीं ग्रस्त करून सोडलें होतें. ज्या रस्त्यावर पूर्वी चंदनाचे व कुंकुमाचे सडे घालीत असत तेथें रक्ताचा सडा पडला होता, व जागोजाग योद्ध्यांचीं छिन्न-विच्छिन्न झालेलीं शिरें पडलेलीं असून त्यांवरून औरंगजेबाचा असंख्य सैन्यभार पर्वा न करितां तुड-वीत चालला होता. औरंगजेबाचे लोकांनीं क्रोधानें शहरांतील मोठमोठे वाडे जमीनदोस्त करून टाकले व मन मानेल तीं अनन्वित कृत्यें केलीं ! ! ”

यापुढील विजापूरचा इतिहास म्हणजे एक

करुण कहाणीच आहे. औरंगजेबानें कांहीं दिवस विजापुरीं मुक्काम करून त्याची ढांसळ-णारी स्थिति सांवरण्याचे शिकस्तीचे प्रयत्न केले; पण त्यांना यश आलें नाहीं. आईच्या मायेची पांखर नष्ट झालेल्या बालकाचे दाईनें कितीहि लाड केले व कोड पुरविलें तरी तें जसें पूर्ववत् बाळसें धरीत नाहीं, तद्वत् आदिलशाहीच्या काळांतील आपल्या पूर्ववैभवाला विजापूर पुन्हां कधींच पोंचलें नाहीं; व पुन्हां कधीं पोंचेल अशी त्यास आशाहि नाहीं! १६८९ त विजापुरांत एक दुष्ट सांथ उद्भवली. तींत हजारों लोक मृत्युमुखीं पडले. सांथीनंतर औरंगजेबानें विजापूरची शिरगणती केली ती ९ लक्ष ८४ हजार म्हणजे महंमदशहाच्या वेळेपेक्षां दहा लक्ष सोळा हजारांनीं कमी भरली. १७०७ मध्यें चिंक्किजखान (हैद्राबादच्या निजामशाहीचा संस्थापक) विजापुरास सुभेदार होता. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (१७०७) त्याचा मुलगा राजपुत्र कामबक्ष यानें 'दिन्पन्हा' किताब धारण करून विजापुरास स्वतंत्र राज्य स्थापिलें व आपल्या नांवाचीं नाणीं पाडलीं. दिल्लीच्या बाहादुरशहास हें न आवडून त्यानें कामबक्षाशीं

समेटाचा प्रयत्न केला; व तो अयशस्वी ठरल्यावर युद्ध केलें. त्यांत कामबक्ष मरण पावला, व विजापुरावर हैद्राबादच्या मोगल सुभेदारांची सत्ता सुरू झाली. १७१० व १७१७ त विजापूरप्रान्तांत तीव्र दुष्काळ पडून त्यानें हजारों लोकांना अन्नान्नदशेस व शेंकडों लोकांना मृत्युपंथास लाविलें. हैद्राबादचे निजामांनीं मोगल बादशहाची सत्ता झुगारून स्वातंत्र्य पुकारलें तेव्हां विजापूर त्यांच्याच ताब्यांत राहिलें; १७६० मध्यें उदगीरच्या लढाईनंतर तें पेशव्यांच्या सत्तेखालीं आलें. १७८४ त विजापुरांत भयंकर दुष्काळ पडला व तो तीन वर्षें टिकला; तो इतका भयंकर होता कीं त्याला बळी पडलेल्या मृतांच्या अस्थींनीं अनेक मैलपर्यंत जमीन पांढरी दिसत होती! १७९२ त ले. मूर नांवाच्या इंग्रजानें विजापुरास भेट दिली, तेव्हां त्याला विजापूर शहर बाजूच्या उध्वस्त प्रदेशाच्या मानानें अगदींच लहान दिसलें. गांवांत चोरांचा सुळसुळाट होता. त्यांतच पेंढाऱ्यांची धाड आली. याच वेळीं पेशव्यांनीं विजापुरांतील सर्व मुसल्मान इनामें व बक्षिसें जप्त केलीं. पुष्कळ लोक गांव सोडून हैद्राबादीं गेले. १८०८ मध्यें मुंबईचे

## विजापूर—

रेकॉर्डर सर जेम्स मॅकिन्टॉश् यानें या जवळजवळ ओसाड शहरास भेट दिली; त्यानें विजापुराचें मोठें करुणास्पद वर्णन केलें आहे. १८१९त एल्फिन्स्टन् व १८२६त ग्रँट् डफ् विजापुरास आले होते, त्यांचीं-हि वर्णनें अशींच आहेत. सतराव्या शतकांत शिवाजींच्या उदयापूर्वी जवळ जवळ सारें दक्षिण हिंदुस्थान ज्या आदिलशाहीच्या सत्तेखालीं होतें (सन १६३६) त्या आदिलशाहीच्या या राजधानीस सर्व हिंदुस्थानांत दुसरा व मुसलमानी जगांत चौथा (रूम, इस्फहान व दिल्ली यांचे खालोखाल) मान मिळत असे. विजापूरच्या तेव्हांच्या व आतांच्या स्थितींत जमीन अस्मानाचें अंतर पडलें होतें. १८१८ ते १८४८ पर्यंत विजापूर सातारकरांच्या सत्तेखालीं होतें. त्यानंतर तें इंग्रजांकडे गेलें.

१८६३ पर्यंत विजापूर सातारा जिल्ह्यांत होतें. नंतर तें कांहीं दिवस सोलापूर जिल्ह्यांत समाविष्ट झालें; परंतु 'करजगी' हा स्वतंत्र जिल्हा झाला तेव्हां विजापूर तिकडे सामील करण्यांत आलें. या जिल्ह्यांत विजापूरची स्थिति मध्यवर्ती असूनहि येथें जिल्ह्याचें ठाणें बरेच दिवस नव्हतें.


विजापुरांत १८७७–७८ त जो दुष्काळाचा कडाका उडाला त्याचें गायकवाडांनीं इतकें सरस वर्णन केलें आहे कीं, तें थोडें विस्तृत झालें तरी येथें जसेंच्या तसें उतरून घेण्याचा मोह आवरत नाहीं.

" सोलापूर, विजापूर वगैरे शहरें व आसपासचीं चटसारीं खेडींपाडीं त्या दुष्काळानें दाढेंत आवळून धरलीं होतीं, व तो आतां त्यांचा स्वाहा करितो कीं काय असें पाहून लोक परलोकच्या यात्रेच्या तयारीला लागले होते; व कित्येकांनीं मुक्कामहि गांठला होता. तेथील लोक ह्या दुष्काळासंबंधीं जो मजकूर सांगतात तो ऐकून अंगावर रोमांच उभे रहातात. हाय हाय ! काय तो दुर्धर प्रसंग !! ईश्वर करो, आणि वैऱ्या-वरहि असा प्रसंग न येवो ! जातिवंत मराठे—ज्यांच्या स्त्रिया नेहमीं गोषांत राहून काळ काढावयाच्या, करडे मुसलमान—ज्यांच्या स्त्रिया झरोक्यांत बसून आनंदांत दिवस लोटावयाच्या, कुलीन शेतकरी—ज्यांच्या स्त्रिया हारेच्या हारे भरून भाकरतुकडा शेतांत गडयामाणसांस पाठवून गोष्टी सांगत बसावयाच्या, भस्मचर्चित लिंगाईत—ज्यांच्या स्त्रिया ' खडम् खडम् ' करणारें चांदीचें लिंग गळ्यांत

अडकावून मोठ्या थाटानें कापसाच्या मोसमांत कापूस कांतीत 'बिडुशरग पोगुवेनु नानु खचित बिड बिडुशरग पोगुवेनु नानु' असें मधुर गाणें गात बसावयाच्या, गृहस्थ ब्राह्मण—ज्यांच्या स्त्रिया हळद-कुंकवाकरितां झुणझुण आवाज करीत एकाच्या घरून दुसऱ्याच्या घरीं विद्युल्लतेप्रमाणें जावयाच्या; पण काय! त्यांच्या त्या स्त्रियांची जी कांहीं दशा झाली त्याचें वर्णन करण्यास यमाजीपंतासच सांगितलें पाहिजे! पहिल्या वर्षी त्यांनीं दाणागोटा जो कांहीं शिल्लक होता त्याचा फन्ना पाडिला; दुसऱ्या वर्षी डागडागिणा, चीजवस्त, गुरेंढोरें, यांस वाटेस लाविलें व तिसऱ्या वर्षी कफल्लक होऊन अन्न अन्न करून पटापट मरूं लागले. ज्या स्त्रियांनीं कधीं ऊन पाहिलें नाहीं त्यांस हजार ठिगळ्यांचें वोंदर नेसून अन्नाकरितां दारोदार तोंड पागळावें लागलें! ज्या स्त्रियांस आपलीं तान्हीं स्तनपान केल्याशिवाय एक क्षणहि मोठ्या संकटानें लोटावा लागे, त्यांनीं आपल्या तान्हुल्यांस रस्त्यांतच शेवटचें स्तनपान देऊन व त्यांचें शेवटचें मुखावलोकन करून सोडून दिलें! ज्यांनीं आपल्या भर्त्यांस व त्या भर्त्यांनीं आपल्या चारुगात्रीस



आनंद महाल



जोड घुमट

अवलोकन केल्याशिवाय क्षण घालविला नाहीं, त्यांनीं ह्या पोटाकरितां त्यांस सोडून देशान्तराची वाट धरली. शेतकऱ्यांचे पंचप्राण म्हटले म्हणजे गुरांढोरांवर; तीं गुरेंढोरें त्यांनीं बंधमुक्त करून त्यांचें शेवटचें दर्शन घेतलें. जें शेत आपल्या कुवतींत आलें म्हणजे कणसांनीं डोलूं लागे त्या शेताच्या मेरेवर जाऊन शेतकऱ्यांनीं खळखळ रडावें ! मोलमजुरी करणारे कंगाल, ज्यांचें हातावर पोट ते तर दुष्काळाच्या पहिल्याच वर्षी यमसदनास हजिरी देण्यास गेले. ऐन उन्हाळ्यांत क्षुद्र प्राणी जसे मरून जिकडे तिकडे पडतात त्याप्रमाणें त्या श्रेष्ठ मानव प्राण्याची स्थिति झाली ! शहरो-शहरीं, खेडोखेडीं, रस्तोरस्तीं व गल्लोगल्लीं ह्या हत-भागी मानव-प्राण्यांचीं कलेवरें शुष्क लाकडांसारखीं पडलीं ! ह्या दुष्काळांत इकडील सुमारें ४०००० लोक मृत्युमुखीं पडले असा अजमास आहे. पूर्वी लढाईत लोक मरत होते, हल्लीं तो 'वेडगळ' प्रकार नाहीं; परंतु त्याऐवजीं दुष्काळ मनुष्यास घशांत ओढून घेण्यास तोंड पसरून बकध्यानाप्रमाणें बसला आहे ! ! ''

१८८२ चे सुमारास एम्. एस्. एम्.चा रेल्वे-रस्ता होटगीपासून गदगपर्यंत चालू झाला;

**विजापूर—**

विजापुरास स्टेशन झालें व थोडयाच दिवसांत जिल्ह्याचें ठाणेंहि झालें. पुष्कळ जुन्या इमारती दुरुस्त करून सरकारनें तेथें कचेऱ्या, तुरुंग, न्यायकोर्टें इत्यादींना जागा दिल्या. १८५४ पासून म्युनिसिपालिटी होतांच; थोडयाच दिवसांत शाळा, इस्पितळें झालीं; विजापुरास कांहीं तरी महत्त्व येऊं लागलें व लोकसंख्याहि वाढूं लागली. सोलापूर, हुबळी, अथणी या शहरांशीं जोडणाऱ्या सडका दुरुस्त झाल्या व दळणवळण, व्यापार वाढला. सध्यां विजापुरास धान्याचा व गुरांचा मोठा व्यापार चालतो. जिल्ह्यांत तयार होणाऱ्या हातमागावरील सुती, रेशमी कापडाची, कांबळ्यांची मुख्य बाजारपेठ इथेंच आहे. येथील हवा कोरडी व निरोगी आहे. पाऊस वर्षांतून २०-२५ इंच पडतो. मार्च-एप्रिलांत उन्हाळा फार असतो; पारा कधीं कधीं १०८° पर्यंत जातो. सध्यां लोकसंख्या सुमारें चाळीस हजार आहे. पुष्कळशा जुन्या इमारती सरकारनें पुराणवस्तुसंशोधनखात्याच्या ताब्यांत बऱ्याचशा सुस्थितींत ठेवल्या आहेत. सारांश, विजापूर आतां अगदींच खालावलेलें नाहीं; उलट वाढतेंच आहे. अर्थात् आजच्या दृष्टीनें !

एडवर्ड-पार्कमधील आमचें फिरणें झाल्यावर नळाचें पाणी बंद होईल या धास्तीनें घाईघाईनें धर्मशाळेंत परत आलों. पण तोंपर्यंत पाणी गेलेंच होतें. मग तेथील व्यवस्थापकांनीं एक घागर पाणी दिलें. त्यावर आम्हांला भागवावें लागलें. आमच्याजवळची शिदोरी संपली होती; तेव्हां बाजारांत जाऊन खाद्य-पेयांची खरेदी केली, मंडई एडवर्ड चौकापासून फारशी लांब नाहीं. झालें एवढें पुष्कळ पाहून झालें, व जरी आणखी पहाण्याचें राहिलें होतें तरी पुनः आणखी कधीं तरी येऊं, असा विचार करून आम्हीं दुसरे दिवशीं निघण्याचें ठरविलें. कदाचित् जातांना एखादा दिवस जास्त लागण्याचा संभवहि होता; कारण दिवस पावसाचे, त्यांतून एखादे वेळीं अपघातहि व्हायचा. वाटेनें स्वयंपाक वगैरेची भानगड नको म्हणून, आम्ही सर्वजण नेहमीं एकादशी करणारे नव्हतों तरी ही एकादशी करण्याचें ठरविलें, व त्याकरितां फळें व फराळाचें सामान विकत घेतलें. येथें बाजारांतच गवळी-लोक रस्त्यावर म्हशी घेऊन उभे असतात, व गिऱ्हाइकाला समक्ष दूध काढून देतात; त्यामुळें गवळ्याचें घर शोधीत जाण्याचा प्रसंग

## विजापूर—

विजापुरास स्टेशन झालें व थोड्याच दिवसांत जिल्ह्याचें ठाणेंहि झालें. पुष्कळ जुन्या इमारती दुरुस्त करून सरकारनें तेथें कचेऱ्या, तुरुंग, न्यायकोर्टें इत्यादींना जागा दिल्या. १८५४ पासून म्युनिसिपालिटी होतांच; थोड्याच दिवसांत शाळा, इस्पितळें झालीं; विजापुरास कांहीं तरी महत्त्व येऊं लागलें व लोकसंख्याहि वाढूं लागली. सोलापूर, हुबळी, अथणी या शहरांशीं जोडणाऱ्या सडका दुरुस्त झाल्या व दळणवळण, व्यापार वाढला. सध्यां विजापुरास धान्याचा व गुरांचा मोठा व्यापार चालतो. जिल्ह्यांत तयार होणाऱ्या हातमागावरील सुती, रेशमी कापडाची, कांबळ्यांची मुख्य बाजारपेठ इथेंच आहे. येथील हवा कोरडी व निरोगी आहे. पाऊस वर्षांतून २०-२५ इंच पडतो. मार्च-एप्रिलांत उन्हाळा फार असतो; पारा कधीं कधीं १०८° पर्यंत जातो. सध्यां लोकसंख्या सुमारें चाळीस हजार आहे. पुष्कळशा जुन्या इमारती सरकारनें पुराणवस्तुसंशोधनखात्याच्या ताब्यांत बऱ्याचशा सुस्थितींत ठेवल्या आहेत. सारांश, विजापूर आतां अगदींच खालावलेलें नाहीं; उलट वाढतेंच आहे. अर्थात् आजच्या दृष्टीनें !

एडवर्ड-पार्कमधील आमचें फिरणें झाल्यावर नळाचें पाणी बंद होईल या धास्तीनें घाईघाईनें धर्मशाळेंत परत आलों. पण तोंपर्यंत पाणी गेलेंच होतें. मग तेथील व्यवस्थापकांनीं एक घागर पाणी दिलें. त्यावर आम्हांला भागवावें लागलें. आमच्याजवळची शिदोरी संपली होती; तेव्हां बाजारांत जाऊन खाद्य-पेयांची खरेदी केली, मंडई एडवर्ड चौकापासून फारशी लांब नाहीं. झालें एवढें पुष्कळ पाहून झालें, व जरी आणखी पहाण्याचें राहिलें होतें तरी पुनः आणखी कधीं तरी येऊं, असा विचार करून आम्हीं दुसरे दिवशीं निघण्याचें ठरविलें. कदाचित् जातांना एखादा दिवस जास्त लागण्याचा संभवहि होता; कारण दिवस पावसाचे, त्यांतून एखादे वेळीं अपघातहि व्हायचा. वाटेनें स्वयंपाक वगैरेची भानगड नको म्हणून, आम्ही सर्वजण नेहमीं एकादशी करणारे नव्हतों तरी ही एकादशी करण्याचें ठरविलें, व त्याकरितां फळें व फराळाचें सामान विकत घेतलें. येथें बाजारांतच गवळी-लोक रस्त्यावर म्हशी घेऊन उभे असतात, व गिऱ्हाइकाला समक्ष दूध काढून देतात; त्यामुळें गवळ्याचें घर शोधीत जाण्याचा प्रसंग

टळला. कोल्हापुरासहि अशीच पद्धति पाहिली होती. सोलापुरापेक्षां दूध व दुभतें वरेंच स्वस्त आहे. पूर्वी येथें गवळ्यांचीं घरें पुष्कळ होतीं. बरींचशीं आतां सोलापुरीं जाऊन तेथेंच स्थायिक झालीं आहेत.

दुसरे दिवशीं आम्ही पहांटे उठलों. तों आकाश सारें मेघांनीं व्याप्त झालें आहे व गार वारे वहात आहेत असें आढळलें. तरी आम्हीं निघण्याची तयारी केलीच. साऱ्या सामानाची बांधाबांध करून व्यवस्थापकांची घागर परत केली, व पहांटेसच विजापुराच्या बाहेर पडलों. जवळच्या घोंगड्या मात्र बांधून न ठेवतां वरच घेतल्या होत्या. रस्त्यानें गवताचे भारे डोक्यावर घेऊन शहराकडे येणारे लमाण–स्त्रीपुरुष ' रामपाऱ्यां 'त मंजुळ गाणीं म्हणून वाटचालीचे श्रम सुसह्य करीत चालत असलेले वरेच आढळले. सहाव्या मैलावर मार्गे ज्या ओढ्यांत अपघात झाला होता तेथें आम्ही थांबलों. प्रातर्विधी व स्नान उरकलें. अद्याप सूर्योदय झाला नव्हता. तेव्हां पहांटेच्या थंड वेळीं मार्ग आक्रमण्यास उत्साह वाटत होता. सूर्योदय झाल्यावर मेघपटल नाहींसें झालें, व आतां पावसाची भीति गेली या आनंदांत आम्ही जाऊं लागलों. पण

या भागांत रात्रीं पाऊस पडला होता, त्यामुळें रस्ता अतिशय खराब झाला होता. क्वचित् स्थळीं सायकलीवरून खालीं उतरून चालावें लागे. धबधब्याच्या ओढ्याला निसर्गाच्या कृपेमुळें पावसाच्या पाण्यानें आनंदाचें भरतें आलें होतें असें दिसलें. आतां इथून चढाला सुरवात झाली. पण इकडे पाऊस कमी होता म्हणून फारसा त्रास झाला नाहीं. १८ व्या मैलावरची टेकडी चढून गेल्यानंतर गोलघुमटाचें एकदां प्रमुदित अंतःकरणानें निरीक्षण केलें व उताराला लागलों. पण इतक्यांत २४ व्या मैलाजवळ जवळपास कुठें गांव नाहीं अशा ठिकाणीं पूर्वेकडून पावसाळी ढग जोरानें चाल करून येत आहेत असें दिसलें, व पहातां पहातां पाण्याचे थेंब अंगावर पडूं लागले. टेकडीचा घाट संपून आतां आम्ही सपाट प्रदेशांत आलों होतों तोंच पावसानें अगदीं घाटांत गांठलें. तेव्हां एका वृक्षातळीं बसून जवळच्या घोंगड्या पांघरल्या व पावसाचा जोर कमी झाल्यावर पुन्हां वाट चालूं लागलों. ३१ व्या मैलावर झाळकी गांव लागलें; तेथें फलाहार करून विश्रान्ति घेतल्यावर पुन्हां मोठ्या उत्साहानें वाट चालूं लागलों,

व यथाकाल सोलापुरीं येऊन पोंचलों. जातां जातां सायकलच्या प्रवासासंबंधीं थोडासा विचार करूं.

प्रवासाचीं साधनें मुख्यतः आगगाडी, आगबोट, मोटार, मोटारसायकल, घोडा अगर घोड्याची गाडी व बैलगाडी हीं होत. परंतु या साधनांचा उपयोग करून प्रवास करण्यापेक्षां पायीं प्रवास करण्यांत 'निर्भेळ स्वातंत्र्य' आहे; आणि या प्रकारांत आरोग्य व स्वावलंबन यांची अभिवृद्धि जितकी होते तितकी इतर कोणत्याहि प्रकारांत होत नाहीं. आगगाडींतून प्रवास करतांना, गाडी गांठण्याच्या गर्दीत कित्येक प्रेक्षणीय स्थळें घाईनें पहावीं लागतात, कित्येक अजिबात गाळावीं लागतात, तर कित्येक आगगाडी-च्या टापूंत येतच नाहींत. मोटारचेंहि तसेंच. घोड्यावरून प्रवास करण्याची चाल आतां मागें पडली. पायीं प्रवासांत सृष्टीशीं जितकें निकट साहचर्य घडतें, तितकें नाहीं तरी त्याहून किंचित् कमी प्रतीचें साह-चर्य सायकलीच्या प्रवासांत घडतें. पायीं किंवा साय-कलीच्या प्रवासांत जे अनुभव येतात, नानाविध देशांशीं, प्रान्तांशीं, माणसांशीं जे संबंध येतात त्यांचें महत्त्व तर अमोलिक आहे. सायकलीच्या प्रवासांत

वेळेची काटकसर होऊनहि पायीं प्रवासाप्रमाणें सर्व स्थळें निवान्त अंतःकरणानें पहातां येतात. सायकलीनें मलावरोध होतो व हृदयाचे विकार वाढतात असें कांहींचें म्हणणें आहे, व त्यांत अगदींच तथ्य नाहीं असें नाहीं. परंतु यौगिक व्यायाम केल्यानें असले अनिष्ट परिणाम होत नाहींत असा प्रस्तुत लेखकाचा अनुभव आहे. दुबळ्या हृदयाच्या माणसानें अशा प्रवासांत भाग घेऊं नये हें चांगलें, व सशक्तांनींहि 'उपायापेक्षां अटकाव चांगला' इकडे दृष्टि देऊन लांब लांब मजला मारण्याचा मोह टाळावा. प्रवासांत सोबती असले म्हणजे मजा येते; पण सर्वांचे स्वभाव मनमिळाऊ व कष्टाळू असून परस्परपूरक व पोषक असणें इष्ट आहे. त्यांत एखादा तरी सायकलीच्या यंत्राचा तज्ज्ञ पाहिजे. पंक्चरादि छोटे–मोठे अपघात व्हावयाचेच. प्रवास उन्हाळ्यांत केल्यास वस्त्र-प्रावरणांचें लटांबर कमी करतां येतें; पण उन्हाला फार जपलें पाहिजे. हिंवाळ्यांत किंवा पावसाळ्यांत इतर आवश्यक वस्त्रांबरोबर घोंगडी अवश्य घ्यावी. ती हरकामी असते. अंथरतां येते किंवा पांघरतां येते. 'कंबलवन्तं न बाधते शीतं' यांतील मर्म

ओळखलें पाहिजे. पावसांतहि घोंगडीचा रेन-कोटा-सारखा उपयोग होतो. लवंग, सुंठ, आयोडिन-सारख्या सर्वौषधी जवळ बाळगाव्यात. सायक-लीचें सामान तर घ्यावें लागतेंच, त्यांत कांहीं जादा सामानहि बाळगणें आवश्यक आहे. शक्य तर फोटोग्राफीचें ज्ञान असलेल्या प्रवाशांनी चांगलासा कॅमेरा व फोटोविषयक इतर सामान बरोबर घ्यावें. याशिवाय पाण्याची पिशवी, चाकू, दोरी इत्यादि सामान विशेष निर्देशानें सांगण्याची आवश्य-कता नाहीं. रोजची मजल ५०-६० मैलांची करावी; संवय नसल्यास पन्नासाचे आंतच प्रमाण ठेवावें. घाटाची चढण फार असल्यास पायीं चालावें, व्यर्थ चुरशीच्या भरीस पडून शक्तीचा अपव्यय घाट चढ-ण्यांत व अतिरिक्त वेगानें जाण्यांत करूं नये. त्यांत धोका आहे. अनोळखी रस्त्यानें रात्रीचा प्रवास करूं नये; पण रस्ते ओळखीचे व बिनधोक्याचे असतील तर रात्रीची चांदण्यांतील मजल फार सुखकर होते असा आमचा अनुभव आहे. सारांश, सायकली-सारख्या सुटसुटीत वाहनाचा प्रवासाच्या कामीं तार-तम्यानें उपयोग केला तर स्वावलंबनपर प्रवास

होऊन त्यांत वेळेची व पैशाची बचत होते, व पायीं प्रवासाचे बहुतेक फायदे मिळतात यांत शंका नाहीं. म्हणूनच ‘ निर्भेळ स्वातंत्र्या ’खालोखाल ‘ साम्राज्यान्तर्गत वसाहतींच्या स्वराज्याचा दर्जा ’ सायकलीच्या प्रवासास देतां येईल. या स्वराज्याचें सुख प्रस्तुत लेखकानें थोडें-फार अनुभवलें असल्यामुळें, महाराष्ट्रीय तरुणांनीं सायकलीच्या स्वावलंबनपर प्रवासाची प्रथा पाडावी अशी त्याची उत्कट इच्छा आहे. एवढ्यासाठीं, अननुभवी प्रवाशांना उपयुक्त होतील अशा सूचना येथें संक्षेपतः दिल्या आहेत. सुदैवानें, महाराष्ट्रांत प्रेक्षणीय स्थळांची वाण नाहीं. शाळा-कॉलेजांतील विद्यार्थी मनावर घेतील तर दरेक सुटीमध्यें एखाददुसऱ्या स्थळाचा प्रवास त्यांना ‘ सुखेनैव ’ करतां येईल.


प्रेक्षणीय स्थळें पहाण्यासाठीं प्रवास करण्यांत विद्यार्थ्यांनीं आपल्या सुटींतला वेळ फुकट घालवूं नये, असें सांगण्याची कांहीं विद्वान भाषकांची व लेखकांची वटवट आहे; परंतु प्रवासी जो प्रवासास निघतो तो एक प्रेक्षणीय स्थळेंच पहातो व दुसरें कांहीं ही त्यास हौस व जिज्ञासा नसते असें नाहीं.

... ग्रंथ संग्रहालय ...
क्र. ५०२९

सांगलीस गेलेला प्रवासी तेथील गजानन वीव्हिंग मिल्स् पाहिल्यावांचून परतेल किंवा कानपुरास गेल्यावर तेथील स्वदेशी कारखान्यांकडे तो कानाडोळा करील हें संभवत नाहीं. पायीं किंवा सायकलीवरून प्रवास करितांना वाटेंतील खेड्यांना मुक्काम पडतात, तेथील जीवनक्रमाची व परिस्थितीची माहिती करून घेतां येते. परप्रान्तांतून प्रवास केल्यास तेथील भाषेचें व आचारविचारांचें थोडेंबहुत तरी ज्ञान प्राप्त होतेंच. देशभक्तांच्या दृष्टीनें पाहिलें तरी 'स्वर्गादपि गरीयसी' अशा मायभूमीचें डोळे भरून दर्शन घेतल्यानंतर तिच्याविषयीं शाश्वत प्रेम व सत्य अभिमान जागृत झाल्यावांचून रहातील हें विसंगत व असंभाव्य वाटतें. असें असूनहि ज्यांना प्रवासाची उपयुक्तता कळत नाहीं त्यांना 'जानन्ति ते किमपि तान्प्रति नैष यत्नः' असेंच म्हटलें पाहिजे. शेवटीं, हरिदासाच्या कथेप्रमाणें मूळ पदावर येऊन सांगायचें झालें तर लेखाच्या आरंभीं दिलेल्या ...ति सूत्रमय उक्तीचें वाचकांनीं चिंतन व ...उ आचरण करावें, एवढें सांगून त्यांची रजा ...र-

...वास

---




आलीजाह दरबार प्रेस, — ग्वालियर.